रायगड, बुधवार, दि. २ ऑक्टोबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹



(छायाचित्र : समीर मालोदे)

## पेझारीतील संवाद मेळाव्याला हजारो महिलांची उपस्थिती

# लाडक्या बहिणीने सत्ताधाऱ्यांना खाली खेचावे

। अलिबाग । प्रतिनिधी ।

**देशात आणि राज्यात बेरोजगारीसह महिलांचा सन्मान, त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. महिला-मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे हे सरकार सत्तेत बसण्याच्या लायकीचे नाही. विधानसभेच्या निवडणुकीत त्यांना सत्तेतून पायउतार करण्यासाठी महिलांनी सज्ज व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांनी केले.**

प्रकल्पाच्या नावाखाली लाखो हेक्टर जमीन घेऊन शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम हे सरकार करत आहे. फक्त जाहिरातबाजी करुन नागरिकांना पर्यायाने मतदारांना भुलवण्यात येत आहे. यासाठी हजारो कोटींचे कर्ज डोक्यावर घेतले आहे. ते फेडण्यासाठी कराच्या रुपातून तुमच्या-आमच्याकडूनच पैसे वसूल केले जातील. एका हाताने द्यायचे आणि दुसऱ्या हाताने वसूल करायचे, असा धंदा या सरकारचा सुरु आहे, असे जबरदस्त टीकास्त्र महाजन यांनी डागले.

रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशन पुरस्कृत 'लेक शिवबा'ची अंतर्गत शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने महिला संवाद मेळाव्याचे आयोजन पेझारी येथील भैरवनाथ क्रीडा मैदानात मंगळवारी (दि.१) करण्यात आले. यावेळी उल्का महाजन बोलत होत्या.

यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, रायगड जिल्हा महिला बचत गट फेडरेशनच्या उपाध्यक्षा तथा माजी नगरसेविका वृषाली ठोसर, संजना कीर, पंचायत समितीच्या माजी सभापती विद्या म्हात्रे, शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख प्रीती पाटील, सरपंच प्राजक्ता म्हात्रे, उपसरपंच ॲड. मनोज धुमाळ, अनिता पाटील, भैरवी जाधव-पाटील आदी मान्यवरांसह फेडरेशन व महिला आघाडीच्या पदाधिकारी, सभासद, जिल्हा परिषद मतदारसंघ कुर्डूस व शहापूर विभागातील महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शौर्याने ही भूमी पावन झालेली आहे. याच भूमीत नारायण नागू पाटील यांच्या नेतृत्वाखाली चरीचा संप झाला. खोतीविरोधात ते लढले होते. या लढ्यातून स्वाभिमानाची, हक्काची शिकवण मिळाली आहे. ती शिकवण घेऊन महिलांनी या सरकारविरोधात लढा •› पान २ वर



### फटाक्यांची आतषबाजी, फुलांचा वर्षाव

पेझारी येथील भैरवनाथ क्रीडा मैदानात महिलांच्या संवाद मेळाव्याला हजारोंच्या संख्येने महिलांनी उपस्थिती दाखविली होती. चित्रलेखा पाटील, सुप्रिया पाटील, ॲड. मानसी म्हात्रे, उल्का महाजन आदी मान्यवरांचे कार्यक्रमाच्या ठिकाणी आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. त्यानंतर फुलांच्या वर्षाव, तसेच सर्व महिलांनी उपस्थित राहून मान्यवरांचे जल्लोषात स्वागत केले. दरम्यान, ढोल-ताशाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत विविध गाण्यांवर महिलांसह मान्यवरांनी ठेका धरल्याचे दिसून आले. एक वेगळा उत्साह यानिमित्ताने प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावर दिसून आला.

### कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**महिला संवाद मेळाव्याच्या निमित्ताने जिल्हा परिषद मतदारसंघ कुर्डूस व शहापूर विभागातील तीसहून अधिक कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. राजकीय, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक, सहकारी, बँकिंग, सांस्कृतिक अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.**


### उल्का महाजन यांचे महिलांना आवाहन



# ट्रस्टींना अटक कधी करणार?

। मुंबई । प्रतिनिधी ।

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणात उच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. १) पुन्हा एकदा शिंदे सरकार आणि पोलिसांना फटकारले. ज्या शाळेत दोन मुलींवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली, त्या शाळेच्या ट्रस्टींना अद्याप अटक का केली नाही? पोलीस नेमकी कसली वाट पाहत आहेत? आरोपी ट्रस्टींना अटकपूर्व जामीन मिळावा, याची वाट पाहताय का? असा प्रश्नांचा भडीमार करीत न्यायालयाने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले.





दोन चिमुकल्या शाळकरी मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने सुमोटो याचिका दाखल करून घेतली. या याचिकेवर न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. यावेळी शिंदे सरकार आणि बदलापूर प्रकरणात स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाच्या •› पान २ वर

# जंजिरा अद्याप बंदच

## प्रशासनाकडून तारीख पे तारीख



• (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याचे दरवाजे अद्याप बंदच असून, प्रशासनाकडून तारीख पे तारीख देण्यात येत आहे. मागील चार दिवसांपासून जोरदार पावसामुळे किल्ल्यातील साफसफाईचे काम थांबविण्यात होते, परंतु आता वातावरण चांगले असल्याने सफाईचे काम जोरात सुरू आहे. येत्या ६ ऑक्टोबरला किल्ल्याचे दरवाजे पर्यटनासाठी उघडणार, अशी माहिती पुरातत्व विभागाने दिली आहे.

जंजिरा किल्ल्याचे पर्यटकांच्या सुरक्षेसाठी पावसाळ्यात दरवाजे बंद केले जातात. यामुळे या पावसाळी तीन महिन्यांत किल्ल्याच्या आतील आजूबाजूला भिंतीवर व परिसरात मोठ मोठी झाडे व गवत वाढते. त्यामुळे या ठिकाणी सरपटणारे प्राणी असू शकतात. त्यांच्यापासून पर्यटकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. पर्यटकांच्या सुरक्षेच्या दुष्टीने •› पान २ वर

# सिडकोविरोधात कळंबोलीत तणाव

## कारवाईसाठी पोलिसांचा फौजफाटा

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पोलिसांचा फौजफाटा घेऊन सिडकोचे अतिक्रमण विरोधी पथक मंगळवारी (दि. १) कळंबोली गावात कारवाईसाठी दाखल झाले. कारवाईची कुणकुण लागल्याने कारवाईला विरोध दर्शवण्यासाठी यावेळी कळंबोली गावातील नागरिक मोठ्या संख्येने जमा झाले होते.

यावेळी ग्रामस्थांच्या वतीने माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेना नेते बबन पाटील, काँग्रेस नेते सुदाम पाटील, भाजपा नेते रवी पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, माजी नगरसेवक विजय खाणावकर, शेकाप महिला आघाडीच्या सरस्वती काथारा यांनी पुढाकार घेत कारवाईसाठी आलेल्या सिडको अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. चर्चेतून कोणतीही सकारात्मक बाब समोर न आल्याने तसेच सिडको अधिकारी कारवाईवर ठाम असल्याने अधिकाऱ्यांसोबत झालेली चर्चा फिस्कटली असून, सिडकोच्या कारवाईला विरोध म्हणून ग्रामस्थ आणि महिला भरउन्हात रस्त्यावर ठाण मांडून बसले होते.

यावेळी बोलताना माजी आमदार बाळाराम पाटील यांनी सिडकोच्या कारभाराविरोधात संताप व्यक्त केला असून, गरजेपोटी घरांच्या प्रश्नावर सिडको प्रशासनाने एकदाचा काय तो निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे.



### पथक हात हलवत माघारी

**ग्रामस्थांनी केलेल्या विरोधामुळे अखेर सिडकोच्या पथकाला हात हलवत परतावे लागले. यावेळी बाळाराम पाटील, शिरीष घरत, बबन पाटील, रवींद्र भगत, गोपाळ भगत, अमर पाटील ग्रामस्थांसोबत आंदोलनस्थळी उपस्थित राहिल्याने ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.**

# भिंत कोसळून तिघे गंभीर

## जखमींमध्ये दोन महिलांसह बालकाचा समावेश

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील शेलटोली खैराट आदिवासी वाडीवर असलेल्या समाज मंदिराची भिंत कोसळून समाज मंदिरामध्ये झोपलेल्या दोन महिला आणि एक चार वर्षीय बालक जखमी झाले आहे. ही घटना सोमवारी पहाटे सहा वाजता घडली. जखमींवर महाडमधील खासगी रुग्णालयात उपचार केल्यानंतर त्यांना अधिक उपचारासाठी अन्य ठिकाणी हलवण्यात आले आहे.



शेलटोली खैराट आदिवासीवाडी या ठिकाणी पंधरा वर्षे जुनी समाज मंदिराची इमारत आहे. या समाज मंदिरामध्ये दोन दिवसांपूर्वी मोलमजुरी करणारे कुटुंब वस्तीला •› पान २ वर

# नाल्यामध्ये पडून दोघांचा मृत्यू

। पनवेल । वार्ताहर ।

रेल्वे रूळ ओलांडताना रेल्वे रुळाखाली असलेल्या नाल्यात पडल्याने दोघांचा मृत्यू झाल्याची घटना नवीन पनवेल-खांदा कॉलनी रेल्वे रुळाजवळ घडली. या अपघाताची नोंद पनवेल रेल्वे पोलिसांकडे करण्यात आली आहे. अनिल दत्तात्रेय मुळजे (सेक्टर ७, नवीन पनवेल) आणि तुषार संजय कुलकर्णी (३१, रा. कर्मवीर नगर, सातारा) अशी दोघांची नावे आहेत. •› पान २ वर

## स्वच्छतेच्या 'रेटिंग'वरून ठरणार हॉटेल, रिसॉर्टचा दर्जा!

# ग्रीन लिफ रेटिंग प्रणाली

। रायगड । खास प्रतिनिधी ।

प्रमुख पर्यटन स्थळांवर स्वच्छता आणि स्वच्छता मानके सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने केंद्रीय पाणी व स्वच्छता विभाग आणि पर्यटन मंत्रालयाच्या विद्यमाने देशभरात ग्रीन लिफ रेटिंग प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून पर्यटनस्थळांवरील हॉटेल्स, रिसॉर्ट्स, होम स्टे, धर्मशाळांमध्ये पर्यटकांना, नागरिकांना स्वच्छतेच्या दर्जेदार सेवा मिळण्•› पान २ वर

### तीन महत्त्वाच्या निकषांवर मिळणार गुण

**पाणवठ्यामधील प्रदूषण रोखून पर्यावरण स्वच्छ ठेवणे हा स्वच्छता ग्रीन लीफ रेटिंग प्रणालीचा उद्देश आहे. हिरवे पान मानांकन प्रणाली २०० गुणांची आहे. घनकचरा व्यवस्थापन ८० गुण, मैला गाळ व्यवस्थापन ८० गुण, सांडपाणी व्यवस्थापनासाठी ४० गुण असणार आहेत.**

"हरवे पान मानांकन प्रणाली उपक्रमाचा पर्यटनवृद्धीस उपयोग होऊन जिल्ह्याची प्रतिमा उंचावण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील हॉटेल्स, लॉज होम स्टेज, धर्मशाळा यांनी या उपक्रमात सहभागी होऊन पर्यटनवृद्धीच्या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घ्यावा."

– डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद





# महिनाभरातच रस्त्यांची दुरवस्था

## लाखो रुपयांचा चुराडा



। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यात लाखो रुपयांचे रस्ते अवघ्या महिनाभरातच उखडून गेले आहेत. वहुर आणि दासगावमध्ये काँक्रिट पद्धतीने केलेल्या या रस्त्यांना खड्डे पडले आहेत. यामुळे शासन नक्की नागरिकांसाठी रस्ते करतात की ठेकेदारांसाठी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

महाड तालुक्यातील तासगाव आणि वहूर गावात तयार करण्यात आलेले रस्ते अवघ्या काही महिन्यातच उखडून गेले आहेत. हे रस्ते काँक्रिट कामामध्ये करण्यात आले होते. वहूर येथील रस्ता मुंबई-गोवा महामार्गापासून फजंदार हायस्कूलपर्यंत करण्यात आला होता. याकरिता लाखो रुपयांचा निधी खर्ची करण्यात आला आहे. मात्र, हा रस्ता अवघ्या एक महिन्यातच खराब होऊ लागला. पावसाळ्यामध्ये या रस्त्याची दैना उडाली आहे. रस्त्यावर खड्डे पडले असून, यामध्ये पाणी साचले आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी शासनाकडून लाख रुपये टाकले असले तरी संबंधित ठेकेदारांनी मात्र निकृष्ट दर्जाचे काम केल्याने अशी अवस्था निर्माण झाल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले. वहूर गावामधील रस्त्याकरिता खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून हा रस्ता होत असल्याचेदेखील ग्रामस्थांनी सांगितले.

अशीच अवस्था दासगाव गावातील प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्याची झाली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्यालादेखील लाखो रुपये खर्च करण्यात आले. मात्र, या रस्त्याचादेखील अवघ्या काही महिन्यातच बोजवारा उडाला आहे. या रस्त्यावरील सिमेंट काँक्रिट निघून गेल्याने हा रस्ता खड्डेमय झाला आहे. यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचारासाठी जाणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत.

प्रशासनाकडून रस्ते मंजूर करताना गुणवत्तापूर्ण ठेकेदाराची निवड केली गेली पाहिजे. मात्र, ग्रामीण भागामध्ये राजकीय दबावगिरी वापरून कार्यकर्त्यांना या रस्त्यांची कामे दिली जात आहेत. ज्यांच्या नावे निविदा काढण्यात आलेली आहे अशा लोकांकडून किंवा एजन्सीकडून ही कामे केली जात नाही आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या कार्यकर्त्यांकडून ही कामे करून घेतली जात असल्याने रस्त्यांची दुरवस्था होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे.

### पार्ले गावातदेखील अशीच अवस्था

**पार्ले गावामध्ये पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या प्रयत्नातून करोडो रुपये मंजूर केले गेले होते. एकाच गावासाठी सुमारे दीड कोटीचा निधी मंजूर करण्यात आला. या गावातील रस्त्यांचीदेखील अशीच अवस्था झाली आहे. पोलादपूर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून हे काम करण्यात आले होते. अवघ्या चार महिन्यांतच रस्त्यावरील काँक्रिट निघून गेले असून, खडे बाहेर पडले आहेत.**



# खारघरमध्ये मालमत्ता कर संकलन केंद्राचे उद्घाटन

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल महापालिकेच्या वर्धापनदिनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना जास्तीत जास्त सोयीसुविधा देण्याच्या उद्देशाने मंगळवार, दि. १ ऑक्टोबर रोजी खारघरमधील केंद्रीय विहारजवळील प्राईड इमारतीच्या तळमजल्यावर मालमत्ता कर संकलन केंद्राचे उद्घाटन आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपायुक्त बाबासाहेब राजळे, सहायक आयुक्त स्वरूप खारगे, प्रभाग अधिकारी स्मिता काळे, प्रभारी कर अधीक्षक सुनील भोईर, महेश गायकवाड, प्रभारी अधीक्षक जितेंद्र मढवी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

मालमत्ता धारकांच्या बिलांमधील अडचणी लक्षात घेऊन, त्या सोडविण्यावरती महापालिकेच्या मालमत्ता कर संकलन विभागाने भर दिला आहे. नागरिकांना कर भरणे सोपे जावे, त्यांच्या मालमत्ता कराच्या बिलामध्ये दुरूस्ती व्हावी, तक्रारींचे निवारण लवकर व्हावे तसेच महापालिका मुख्यालयात येण्या जाण्याचा वेळ वाचावा या उद्देशाने हे मालमत्ता कर संकलन केंद्र सुरू करण्यात आले आहे.

# रोह्यात पावसामुळे भातपिकाचे नुकसान

## बळीराजाच्या डोळ्यात अश्रू



। चणेरा । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील गेल्या अनेक दिवसांपासून परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. या सर्व जनजीवन विस्कळीत झालेले आहे. ओढे-नाले पुन्हा जोरदार वाहू लागले लागलेत. याचा थेट फटका भातशेतीला झालेला पाहायला मिळत आहे. हातातोंडाशी आलेले पीक पावसामुळे वाया गेल्यामुळे शेतकरी दुःखी झालेला आहे. ऐन कापणीच्या तोंडावर मुसळधार पावसामुळे पीक आडवे केल आहे.

यंदा शेतीला पूरक असा पाऊस झाल्याने भातपीक जोमात होते. त्यामुळे शेतकऱ्याला यावर्षी उत्पन्न वाढेल, अशी आशा होती. परंतु, गेल्या चार-पाच दिवसांच्या अतिमुसळधार पावसामुळे कापणीला आलेले पीक पूर्णतः आडवे पडले असून, शेतकऱ्याला मोठ्या प्रमाणावर नुकसान सहन करावे लागले आहे. त्यामुळे हाता तोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून घेतल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला असून, नुकसानीचे पंचनामे करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

माझ्या शेतीमध्ये चांगल्या दर्जाचे बियाणे पेरले होते. यावर्षी भातपीकदेखील चांगले आले होते. परंतु, भात कापणीच्या तोंडावर पावसामुळे पीक जमीदोस्त होऊन भाताचे दाणे पूर्णतः कालसर पडले आहेत. आता भात झोडल्याशिवाय पर्याय नाही. उरलेले वीस-पंचवीस टक्केदेखील भात मिळणार नाही. तसेच गुरांसाठी लागणारा पेंडा खराब झाल्याने त्यांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाल्याची माहिती बोरघर येथील शेतकरी तुकाराम जानु भगत यांनी दिली.

रोहा तालुक्यात उद्योगधंद्यामुळे लागवडी खालील क्षेत्र कमी झाले असून, यावर्षी सात हजार हेक्टर क्षेत्र शेतजमीन ओलिताखाली आहे. ज्या शेतकऱ्यांची भातशेती कापण्यासाठी तयार झालेली आहे, त्यांनी पावसाचा अंदाज घेऊन कापणी करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी करे यांनी केले आहे.

# लाखो रुपयांची फसवणूक

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

सिम कार्ड बंद करून ते डुप्लिकेट काढून त्याचा वापर करून बँक ऑफ महाराष्ट्राच्या खात्यातून सहा लाख ७६ हजार रुपये परवानगीशिवाय दुसऱ्या बँक खात्यात वळती करून फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. महेंद्र अनंत गोजे हे आरीवली, पनवेल येथे राहात असून, त्यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. त्यांना समोरील इसमाने फोन करून फोरजीची सुविधा फाईव्ह जी मध्ये करून देतो, असे सांगितले. त्यावेळी नंतर बोलू असे गोजे यांनी सांगितले असता दहा-पंधरा मिनिटांनी त्यांचा मोबाईल बंद झाला. त्यांनी गॅलरीत जाऊन चौकशी केली असता आधार कार्डच्या बायोमेट्रिक लॉक असून, ते चालू झाल्याशिवाय मोबाईल चालू होणार नाही असे कळले.

# पादचारी उड्डाण पूल खुला होणार

## काम अंतिम टप्प्यात; विद्यार्थी, नागरिकांची गैरसोय दूर



### चौपदरीकरणाचे काम लवकरच पूर्ण

**बापूसाहेब देशपांडे विद्या संकुलात जाण्यासाठी असलेल्या रेल्वे उड्डाण पुलाला जोडूनच महामार्गावर नव्याने उड्डाणपूल उभारण्यात यावा, असे निवेदन यापूर्वीच देशपांडे विद्यासंकुलाने दिले होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे तत्कालीन प्रकल्प संचालक प्रशांत फेगडे व कार्यकारी अभियंता तसेच महामार्ग चौपदरीकरण कामाचे ठेकेदार यांनी हे काम लवकरच पूर्ण करण्यात येईल, असे सांगितले होते.**

। नागोठणे । वार्ताहर ।

मुंबई-गोवा महामार्गावरील नागोठण्यातील रुची हॉटेल व कोकण एज्युकेशन सोसायटीच्या बापूसाहेब देशपांडे विद्या संकुलाला जोडणाऱ्या महाकाय पादचारी पुलाचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. त्यामुळे हा पूल लवकरच विद्यार्थी व नागरिकांसाठी खुला होणार असून, महामार्ग ओलांडताना विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय व अपघाताचा धोका दूर होणार आहे. मात्र, याआधीच रेल्वे ट्रॅकवर अस्तित्वात असलेल्या दहा फूट रुंदीच्या रेल्वेच्या उड्डाण पुलाला जोडणाऱ्या या नवीन पादचारी पुलाची रुंदी कमी केल्याने पालक-विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे.

महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे महामार्गावर वाहनांची संख्या व वेगही वाढणार असल्याने कोएसोच्या येथील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलात इयत्ता पहिली ते पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांना महामार्ग ओलांडताना त्रास होत आहे. दोन सत्रांमध्ये चालणाऱ्या बापूसाहेब देशपांडे विद्या संकुलातील सकाळच्या सत्रातील अकरावी, बारावीचे विद्यार्थी दुपारी १२ वाजता सुटतात. तर, दुपारच्या सत्रातील पहिली ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी सायंकाळी पाच वाजता सुट्टी झाल्यानंतर हे सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने रेल्वेच्या पुलानंतर त्याला जोडलेल्या महामार्गावरील नव्याने उभारण्यात आलेल्या याच पादचारी पुलावरून जाणार आहेत.नवीन पुलाच्या मध्यावर आधार देण्यासाठी उभारण्यात आलेले पोलादी खांब हे कमी आकाराचे असल्याने भविष्यात काही धोका तर निर्माण होणार नाही ना, अशी भीती पालकवर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

# पेण बँकेच्या ठेवीदारांसाठी उपोषण



। नेरळ । प्रतिनिधी ।

२०१० पासून बंद असलेल्या पेण बँकेच्या ठेवीदारांना न्याय मिळावा आणि त्यांनी गुंतवलेले तसेच त्यांच्या ठेवी अद्याप मिळाल्या नाहीत. खातेदार आणि ठेवीदार यांना न्याय मिळावा यासाठी पोलीस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम यांनी साखळी उपोषण सुरू केले आहे. दरम्यान, रमेश कदम यांच्या साखळी उपोषणाला पेण बँकेचे खातेदार आणि ठेवीदार यांनी मोठा प्रतिसाद पहिल्याच दिवशी दिला.

सन २०१० पासून सन २०२४ पर्यंत या कालावधीत पेण अर्बन बँक ठेवीदारांना ठेवी मिळवून देण्याची आश्वासने दिली गेली आहेत. मात्र एकाही पक्षाच्या सरकारने व नेत्यांनी व लोकप्रतिनिधींनी आश्वासने पूर्ण केले नाहीत. त्यामुळे ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस मित्र संघटनेच्या माध्यमातून २९ सप्टेंबर रोजी कर्जत येथे ठिय्या आंदोलन सुरु करण्यात येईल असा इशारा पोलीस मित्र संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष रमेश कदम यांनी दिला.

ठिय्या आंदोलनानंतरदेखील शासनाने पेण अर्बन बँकेच्या ठेवीदारांना न्याय दिला नाही तर ठिय्या आंदोलनाचे रूपांतर उपोषणात केले जाईल असा इशारादेखील कदम यांनी दिला आहे. लोकमान्य टिळक चौकात सुरू झालेल्या साखळी उपोषणाला रमेश कदम यांच्या सोबतीला गणेश काळे, मेघा राणे, अस्मिता सावंत, सुलभा लोंढे, उपोषणाला बसले आहेत.

# कार्यशाळेचे आयोजन

। पनवेल । वार्ताहर ।

स्वीट एंजल्स प्री स्कूल, दिशा महिला मंच, आणि जय दादा युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्य आणि ताण व्यवस्थापन या महत्त्वपूर्ण विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कामोठातील मसाला मंत्रा सभागृहात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

मानसोपचार तज्ज्ञ डॉ. अमित मेढेकर यांनी या कार्यशाळेला मार्गदर्शन केले. यावेळी मेढेकर यांनी मानसिक स्वास्थ्य टिकवणे आणि ताणतणाव हाताळण्याचे विविध उपाय व तंत्र शिकवले. उपस्थितांनी त्यांच्या व्याख्यानाचा लाभ घेतला. यावेळी ट्रॅडिशनल मार्शल आर्ट्सचे प्रशिक्षक शिहान पाटणकर यांनी स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिके सादर केली. करण्यात आली. कार्यशाळेला कामोठे परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मानसिक आरोग्याच्या महत्त्वावर अधिक जागरूकता निर्माण करण्याचे कार्य या उपक्रमातून साध्य झाले. कार्यशाळेच्या आयोजनाबद्दल सर्व स्तरातून आभार व्यक्त करण्यात आले.



# आदिवासी बांधवांचे रास्ता रोको आंदोलन

। रसायनी । वार्ताहर ।

धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये समावेश करू नये म्हणून रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्यावतीने चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाबाबत खालापूर तहसीलदार अभय चव्हाण व वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांना निवेदन दिले होते. यावेळी आदिवासी महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धनगर समाजाला धनगर आरक्षण मिळावे, धनगडऐवजी धनगर जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी व सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने पंढरपूर व लातूर येथे गेल्या काही दिवसांपासून आमरण उपोषण चालू आहे. त्यांना पाठिंबा देण्यासाठी धनगर समाजाच्यावतीने राज्यभर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. धनगर समाज हा अनुसूचित जातीत येत असल्याने त्यांना अनुसूचित जमातीत समाविष्ट करू नये, असे मोर्चेकऱ्यांचे म्हणणे होते. मुळातच धनगर समाजाची मागणी चुकीची आहे, तिला शासनाने मान्यता देऊ नये, दिल्यास सरकारच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला.

दरम्यान, मोरबे धरण कृती समितीचे आंदोलन लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. अग्निशमन दल, रुग्णवाहिकाही सज्ज ठेवल्या होत्या. खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी चोख कामगिरी केली. निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी शासनाच्या वतीने आदिवासी समाजाचे निवेदन स्वीकारून शासनाकडे पाठविण्यात येईल, असे आश्वासन दिले.

पान १ वरून

# लाडक्या बहिणीने सत्ताधाऱ्यांना खाली खेचावे

दिला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

निवडणुकीच्या तोंडावर या सरकारला बहिणीकरिता दीड हजार रुपये देणे का सुचले? विधानसभा निवडणूक जवळ आल्यावर इतकी माया का उफाळून निघाली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या लाडक्या भावाचे लाड घेण्यापेक्षा संविधानाने दिलेले हक्क आपल्याला मिळविण्यासाठी एकत्र येणे आवश्यक आहे. 'लाड नको, आमचे हक्क हवे' हा विचार घेऊनच महिलांनी पुढे येणे गरजेचे आहे. भ्रष्टाचाराने कमविलेले पैसे आम्हाला नको, असे लाडक्या भावाला सांगून त्यांना परत पाठवा, असे त्या म्हणाल्या.

मागील लोकसभा निवडणुकीत देशात तसेच राज्यात भाजपासह महायुतीला चांगलाच दणका मिळाला. त्यांना मतांची कडकी लागली म्हणून आगामी विधानसभा निवडणुका समोर ठेवून आता बहीण लाडकी झाली आहे. भावांसाठी योजना सुरु केली असून, वयोवृद्धांसाठीदेखील मोफत तीर्थयात्रा सुरु केली. योजना समाजकल्याण विभागामार्फत राबविल्या जात आहेत. गोरगरीब, दलित, ओबीसी, आदिवासी समाजासाठी असलेला पैसा जाहिरातीसाठी वापरला जात आहे. शिष्यवृत्तीसाठी सहा-सहा महिने या समाजातील मुलांना वाट पाहावी लागते, ही मोठी चिंतेची बाब आहे. दर १६ मिनिटाला महिलेवर अत्याचार होत असल्याची आकडेवारी आहे. महिलांचा अनादर करणाऱ्या या सरकारला पुन्हा सत्तेत बसवू नका, असे आवाहन महाजन यांनी यावेळी केले.

# जंजिरा अद्याप बंदच

पुरातत्व विभागाने १३ सप्टेंबरला किल्ला सफाईला सुरुवात केली होती. परंतु, जोरदार पाऊस व वाऱ्यामुळे सफाईच्या कामाला अडथळा येत असल्याने किल्ल्याचे दरवाजे उघडण्यात तारीख पे तारीख पडत आहे, अशी माहिती सहायक संवर्धक पुरातत्व विभाग अधिकारी बजरंग येलीकर यांनी दिली.

ते म्हणाले की, महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून किल्ल्याचे दरवाजे उघडण्यात येणार होते. परंतु, गेले चार-पाच दिवस जोरदार वारा व पावसामुळे सफासफाईच्या कामाला अडथळा निर्माण झाला होता. काम थांबवून घरी परतावं लागतं होते. यामुळे दिवस वाढले; परंतु आता वातावरण चांगले असल्याने किल्ला सफाईला वेग आला आहे. २१ कामगारांबरोबर आमच्या कार्यालयातील बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुंगरे हे स्वतः साफसफाई करत आहेत. येत्या ६ ऑक्टोबरला पर्यटकांसाठी किल्ल्याचे दरवाजे नक्की उघडणार, असे बजरंग येलीकर यांनी सांगितले.

# भिंत कोसळून तिघे गंभीर

आले होते. सकाळी झोपेत असताना या समाज मंदिराची भिंत कोसळली. यामध्ये दोन महिला आणि एक चार वर्षीय बालक गंभीर जखमी झाले आहे. आदिवासी वाडीवरील लोकांनी या जखमींना खासगी वाहनातून महाडमधील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. महाड औद्योगिक पोलीस ठाण्यामध्ये ही माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस रुग्णालयात दाखल झाले. जखमींमध्ये गुजारी इंद्रजित ठाकूर (१९), ज्युली राजपूत ठाकूर (२०) या दोन महिलांसह भाग्य रजपूत ठाकूर (४) असे तीन जण जखमी झाले आहेत. घरातील पुरुष कामाच्या शोधात बाहेर गेले असताना ही घटना घडली.

दोन दिवसांपूर्वी मजुरी करण्यासाठी आपण आलो असल्याची माहिती खैराट आदिवासी वाडीवरील सरपंच यशवंत पवार यांनी देऊन सदर समाज मंदिराचे काम बऱ्याच वर्षांपूर्वी झाले होते. मात्र, त्याच्या पायाचा भाग कोसळलेला होता. दोन दिवस थांबून आम्ही जाणार असल्याची माहिती या कुटुंबांनी दिल्यामुळे त्या ठिकाणी ते आश्रयाला होते, असेही सरपंच यशवंत पवार यांनी सांगितले.

# नाल्यामध्ये पडून दोघांचा मृत्यू

शुक्रवार २७ सप्टेंबर रोजी अनिल मुळजे आणि तुषार कुलकर्णी हे नवीन पनवेल-खांदा कॉलनी येथील रेल्वे रूळ ओलांडून पुढे जात होते. यावेळी रात्रीच्या अंधारात त्यांना रेल्वे रुळाजवळ असलेला नाला दिसून आला नाही. दोघेही या नाल्यात पडले. जोरदार पाऊस असल्याने आणि दहा ते बारा फूट वरून खाली पडल्याने या दोघांचाही यात मृत्यू झाला असल्याची माहिती रेल्वे पोलिसांनी दिली. या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे. नागरिक येथील उड्डाण पुलाचा वापर करत नाहीत. ते थेट रेल्वे रूळ ओलांडून नवीन पनवेल ते खांदा कॉलनी आणि खांदा कॉलनी ते नवीन पनवेल असा प्रवास करत असल्याने ते धोकादायक ठरत आहे.

# ग्रीन लीफ रेटिंग प्रणाली

स्वच्छता हिरवे पान मानांकन (ग्रीन लीफ रेटिंग) प्रणाली रायगड जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे.

त्यानुसार रायगड जिल्ह्यातील संबंधित आस्थापनांना मानांकन दिले जाणार आहे. पर्यटनवाढीसाठी जिल्ह्यातील सर्वांनी यामध्ये सहभागी व्हा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील पर्यटक अनुकूल स्वच्छता सुविधांचे मूल्यमापन करणे (ग्रीन लीफ रेटिंग इन हॉस्पिटॅलिटी फॅसिलिटीज) प्रस्तावित आहे. त्यामुळे सेवाक्षेत्रातील स्वच्छता सुविधा अधिक दर्जेदार होण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. मूल्यांकनामुळे अशा व्यावसायिक आस्थापनांमध्ये विधायक स्पर्धेचे वातावरण निर्माण होऊन त्याचा पर्यटनवृद्धीत उपयोग होऊन जिल्ह्याची प्रतिमा उंचावण्यास मदत होणार आहे.

**जिल्हाधिकारी समितीचे अध्यक्ष**

हिरवे पान मानांकनासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती स्थापन केली आहे. उपाध्यक्षपदी मुख्य कार्यकारी अधिकारी, सदस्य सचिवपदी पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी, तर सदस्य म्हणून पर्यटन विभाग किंवा एमटीडीसी जिल्हा प्रतिनिधी आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने पर्यटन किंवा हॉटेल उद्योगातील प्रतिनिधींचा त्यामध्ये समावेश असेल. तर, तालुकास्तर समिती उपविभागीय दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या सदस्यपदावर गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग उपअभियंता, स्वच्छ भारत मिशनचे विस्तार अधिकारी यांचा समावेश असणार आहे.

# ट्रस्टींना अटक कधी करणार?

वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली. त्यांनी तपासाबाबत दिलेल्या माहितीवर खंडपीठाने असमाधान व्यक्त केले. सुनावणीवेळी खंडपीठाने लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्याच्या तपासाची सद्यःस्थिती विचारली. तपास योग्य प्रकारे सुरु असल्याचा दावा महाधिवक्त्यांनी केला. मात्र, शाळेचे दोन ट्रस्टी अद्याप मोकाट असल्याचे निदर्शनास आल्यानंतर खंडपीठाने पोलिसांच्या कार्यपद्धतीचा समाचार घेतला. तुम्ही त्या दोन्ही ट्रस्टींना अद्याप अटक का केली नाही? एका गंभीर गुन्ह्यात पोलीस इतके ढिम्म कसे राहतात? असा संतप्त सवाल खंडपीठाने केला. याचवेळी तपासात आतापर्यंत काय काय केले, याचा सविस्तर तपशील असलेले प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश पोलिसांना दिले. याप्रकरणी २३ ऑक्टोबरला पुढील सुनावणी होणार आहे.

# बिबट्याने घेतले चौदा गुरांचे बळी

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील रत्नागिरी आणि सातारा सीमावर्ती भागातील जंगलानजीकच्या लोकवस्त्यांमध्ये गेल्या वर्षभरात बिबट्याच्या हल्ल्यात एकूण १४ जनावरांचा बळी गेला असून, अलीकडेच शनिवार, दि. २८ सप्टेंबर रोजी खडकवणे कातळी दत्तवाडीलगतच्या घनदाट जंगलात बिबट्याच्या हल्ल्यात श्रीपत सकपाळ या शेतकऱ्याचा बैल ठार झाल्याची घटना घडल्यानंतर ही संख्या १४ झाली आहे.

बिबट्याच्या हल्ल्यात बैल ठार झाल्याच्या घटनेनंतर शनिवारी दुपारी या घटनेची माहिती नागेश श्रीपत सकपाळ व पळचिल पोलीस पाटील आनंद निविलकर यांनी वनविभागाला कळविली. यावेळी पोलादपूर मंडलचे वनपाल बाजीराव पवार, वनरक्षक अमोल रोकडे व वनकर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. याप्रकरणी पोलादपूर मंडल वनविभागाचे वनपाल बाजीराव पवार यांनी श्रीपत सकपाळ या शेतकऱ्याचा बैल ठार झाल्याच्या घटनेपूर्वी पोलादपूर तालुक्यातील शेतकऱ्यांची १३ जनावरे बिबट्याच्या हल्ल्यामध्ये ठार झाल्याची माहिती देऊन त्या सर्व जनावरांच्या मालकांना त्यांच्या बँकअकाऊंटमध्ये भरपाईपोटी थेट रक्कम जमा करण्यात आली असल्याचे सांगितले. यामध्ये सुरेखा गोपाळ खुटेकर, रा. परसुले यांच्या २ बकऱ्या, चंद्रभागा महाबदी रा.बोरावळे १ गाय, गणपत सावंत, रा. करंजे १ बैल, दिनकर रामजी कोंडरे रा.ताम्हाणे १ गाय, लक्ष्मीबाई रामचंद्र बर्के रा. ओंबळी १ गाय, मारूती रामचंद्र अलगुडे रा. कामथे १ गाय, शंकर रामचंद्र कुरणे रा. किनेश्वर १ गाय, राजू धाऊ बर्गे रा. ओंबळी १ गाय, राघू बाबू कात्रट रा.करंजे १ गाय, सखाराम गणपत कदम रा. कामथे १ गाय, रवींद्र एकनाथ जाधव रा. पळचिल १ म्हैस, तुकाराम रावजी जाधव रा.भोगाव बुद्रुक १ गाय अशी एकूण १३ जनावरांची नुकसानभरपाई संबंधित शेतकऱ्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे.

# वाईट प्रवृत्तीला रोखण्यासाठी पुढे या

## चित्रलेखा पाटील यांचे प्रतिपादन

**अलिबाग :** काही मंडळी आपल्या स्वार्थासाठी दारुसह ड्रग्जच्या आहारी अनेक तरुणांना घालत आहेत. त्याचा तरुणांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. या वाईट प्रवृत्तीला रोखण्यासाठी महिलांनी पुढे येणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केले.

खारेपाट विभाग हा शेतकरी कामगार पक्षाचा आत्मा आहे. या भूमीला संघर्षाची सवय असून, अनेक लढाया लढल्या आहेत. स्व. नारायण नागू पाटील, स्व. प्रभाकर पाटील, स्व. दत्ता पाटील यांच्यासह स्व. मीनाक्षी पाटील, जयंत पाटील, पंडित पाटील यांच्या पाठीशी हा विभाग कायमच राहिला आहे. ही साथ अशीच कायम राहू द्या. तुमच्या व तुमच्या विचारासोबत शेतकरी कामगार पक्ष पाठीशी कायम राहील, असा विश्वास चित्रलेखा पाटील यांनी दिला.

डावी चळवळ चुलीपर्यंत नेण्याचे काम महिलाच करू शकतात. महिलांची वैचारिक उंची वाढावी यासाठी अशा प्रकारचे मेळावे होणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार वाड्या-वस्त्यांमधील महिलांनी पुढे नेणे गरजेचे आहे. वेळप्रसंगी अन्यायाविरोधात लढण्यासाठी म्यानातून तलवार उपसली पाहिजे.

निवडणुका जवळ आल्यावर अनेक योजना सुरु झाल्या. त्यामध्ये लाडकी बहीण योजनेचादेखील समावेश आहे. या योजनेतून अनेक महिलांना दीड हजार रुपये मिळाले. परंतु, कांदा, बटाट्यासह लसणाचे दर गगनाला भिडले आहेत. महागाईची झळ महिलांना प्रचंड बसली आहे. नुसते पैसे देऊन चालणार नाही, तर महिलांना सुरक्षितता मिळाली पाहिजे. पंधराशे रुपये देण्यापेक्षा मुलींना पंधरा हजार रुपये कमविण्यासाठी स्वावलंबी बनवा, त्यांच्यासाठी रोजगाराचे साधन खुले करून द्या, अशी संतप्त टीका चित्रलेखा पाटील यांनी केली. त्या पुढे म्हणाल्या, निवडणुकीत तरुणांसह घरातील प्रमुख मंडळींना दारुच्या आहारी घालण्याचा प्रकार घडतो. त्याचा नाहक त्रास आई, पत्नी, मुलगी व मुलांना होतो. दारुमुळे कुटुंबं उद्ध्वस्त होतात. हे रोखण्यासाठी महिलांनी पुढे येणे आवश्यक आहे. महिला, मुलींवरील अत्याचाराच्या घटना घडू नये यासाठी महिलांनी जागरुक राहिले पाहिजे, आपल्या मुलांनादेखील पालकांनी शिकविले पाहिजे. तरच समाजात अमूलाग्र बदल होईल, याकडे चित्रलेखा पाटील यांनी लक्ष वेधले.



# पुरोगामी विचारांना पाठबळ द्या

## ॲड. मानसी म्हात्रे यांचे आवाहन



**अलिबाग :** सरकारविरोधात एल्गार देण्यासाठी, महिलांना सक्षम करण्यासाठी, त्यांना ताकद देण्यासाठी हा महिलांचा संवाद मेळावा भरविला आहे. आपली वज्रमूठ एक करून पुरोगामी विचारांना पाठबळ द्या, असे आवाहन शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांनी केले.

ही भूमी संघर्षाची असून, याच भूमीत स्व. नारायण नागू पाटील यांच्या नेतृत्वाखाली चरीचा संप झाला. या भूमीने 'कसेल त्याची जमीन' हा कायदा करायला सरकारला भाग पाडले. स्व. प्रभाकर पाटील यांच्यासह याच भूमीने महिलेला जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद दिले. स्व. मीनाक्षी पाटील यांच्या रुपाने महिलेला मंत्रीपद दिले. जयंत पाटील, पंडित पाटील यांना घडवून त्यांचे नेतृत्व कार्यकर्त्यांना मिळाले. याच भूमीत अनेक लढे, आंदोलने झाली आहेत. शोषित, पीडितांच्या पाठीशी उभे राहण्याचे काम शेतकरी कामगार पक्षाने केले आहे, असे ॲड. म्हात्रे यांनी सांगितले. देशासह राज्यात गेल्या सहा महिन्यांत अत्याचाराने कळसच गाठला आहे. शाळकरी मुलींपासून महिलांवर अत्याचार करण्याच्या घटना घडल्या आहेत. तरुणींवर अत्याचार करून त्यांना मारून टाकण्याचे काम केले आहे. अन्याय, अत्याचाराची प्रकरणे दाबण्यासाठी सरकार पंधराशे रुपये देऊन महिलांची किंमत लावत आहे. हे पंधराशे रुपये मिळण्यासाठी महिलांना रोजगार गमवावा लागला. या पंधराशे रुपयांनी हातातले काम काढले. ही भयावह परिस्थिती असल्याचे त्यांनी सांगितले.

निवडणुकीचे पडघम वाजताच अवास्तव योजनांचे गाजर दाखविण्याचे काम सरकारकडून सुरू आहे. 'एक गणवेश, एक राज्य' हा निर्णय घेतला आहे. परंतु, त्यामध्ये प्रचंड घोटाळा आहे. लोकप्रतिनिधींसह सरकार या गणवेशांवर टक्केवारी घेत असल्याची भयावह परिस्थिती असल्याचा आरोप ॲड. म्हात्रे यांनी केला. आता ही हुकूमशाही, दादागिरी चालणार नाही. मॅन केलेली तलवार काढण्याची वेळ आली आहे. महिलांना उद्योगात समान हिस्सा, अधिकार द्या. त्यांना विकासाची दिशा ठरविण्यासाठी निर्णय प्रक्रियेत घ्या. महिलांनी कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता सक्षमपणे काम करावे, असे आवाहन ॲड. म्हात्रे यांनी केले.



नवी मुंबई, पनवेल उरण मतदारसंघ

# दुबार मतदार संशयास्पद

## शेकापकडून नावे रद्द होण्यासाठी न्यायालयात धाव

**। पनवेल । वार्ताहर ।**

भारतीय शेतकरी कामगार पक्षाने पनवेल, उरणसह नवी मुंबईतील विविध विधानसभा मतदारसंघाच्या मतदारसंख्येत ८५,१२९ मतदारांची दुबार नावे तातडीने रद्द करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. शेकापचे माजी आ. बाळाराम पाटील यांनी याबाबत पहिल्यांदा पनवेलच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे मागणी केली. मात्र, त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याची माहिती दिली आहे.

**माजी आ. पाटील यांनी पनवेल विधानसभा मतदार संघात नोंद असलेले आणि आजूबाजूला हाकेच्या अंतरावर असलेल्या इतर उरण, नवी मुंबईतील विधानसभा मतदारसंघात ही नोंद असलेल्या मतदार तसेच संशयास्पद पत्ते नसलेले अणि पनवेल मतदारसंघातील मतदार यादीत दुबार नावे असलेली रद्द करावी, अशी मागणी १० सप्टेंबरला केली होती.**

सर्वाधिक मतदार संख्या असलेल्या विधानसभा क्षेत्रात पनवेल विधानसभा मतदार संघाचा समावेश होतो. या मतदारसंघात ६ लाख ४२ हजार ५७ मतदार आहेत. विविध औद्योगिक वसाहतींसह माथाडी कामगार पनवेलमध्ये राहतात. सध्या पनवेलमधील दुबार नावे असलेल्या मतदारांची संख्या २५ हजार ७७२ एवढी असून पत्ते व दोषयुक्त असलेली ५८८ नावे आहेत. याबाबत माजी आ. पाटील यांनी संशय व्यक्त केला आहे.

उरण विधानसभा मतदारसंघात २७,२७५ मतदार तसेच बेलापूर विधानसभा मतदार संघात १५,३९८ मतदार आणि ऐरोली विधानसभा मतदार संघात १६ हजार ९६ मतदारांची नोंद असल्याचे निदर्शनास आल्याने माजी आ. पाटील यांनी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना निवेदनाद्वारे प्रत्यक्ष दुबार व दोषयुक्त मतदारांच्या नावांची यादीसह नावे कमी करण्यासाठी लेखी तक्रार दाखल केली. अधिकारी वर्गाकडून दिरंगाई होण्याची शक्यता असल्याने व मतदार संघात बोगस मतदान होऊ नये यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

# 'नो एन्ट्री'मधून प्रवास करणाऱ्यांवर कारवाई

**। कर्जत । वार्ताहर ।**

शहरात नो एन्ट्रीमधून प्रवास करणाऱ्यांवर कर्जत पोलिसांकडून दंडात्मक कारवाईला सुरुवात झाली आहे. पोलिसांनी एका दिवसात ८० जणांवर करवाई करून ४१,५०० रुपयांचा दंड वसूल केला आहे. कर्जत शहर बचाव समितीच्या आंदोलनाची प्रशासनाकडून दखल घेण्यात आली आहे. कर्जत शहरात होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करीत प्रशासनाकडून शहरात मुख्य बाजारपेठेत एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्या वाहनचालकांची बाजारपेठेत वाहन आणण्याची संख्या कामी झाल्याने वाहतूक कोंडी होत नसल्याचे दिसून येत आहे. मात्र, तरीही काही दुचाकी वाहनचालक नो एन्ट्रीमधून प्रवास करत आहेत.

सोमवारी (दि.३०) पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, वाहतूक पोलीस हवालदार दिपक साटोटे, गणेश बोऱ्हाडे यांनी ही धडक कारवाई केली.




| प्रकार | वाहनाचे टनेज** | प्रत्येक वाहनासाठी इन्सेंटिव्हज* |
|---|---|---|
| अवजड व्यावसायिक वाहन (एचसीव्ही) | >15 | ₹4,50,000 |
| मध्यम व्यावसायिक वाहन (आयसीव्ही) | >10, <15 | ₹3,15,000 |
| हलके व्यावसायिक वाहन (एलसीव्ही) | >3.5, <10 | ₹1,80,000 |
| बस | लागू नाही | ₹2,70,000 |


# मंडळांना नवरात्रौत्सवाचे वेध

**। उरण । वार्ताहर ।**

गणेशोत्सव संपताच आता नवरात्र उत्सवाचे वेध लागले आहेत. यावर्षी गुरुवारी ३ ऑक्टोबर रोजी नवरात्रौत्सवाला प्रारंभ होत असल्याने कार्यकर्त्यांकडून उत्सवातील कार्यक्रमांचे नियोजन सुरू आहे. मूर्तिकारांची मूर्ती पूर्ण करण्याची लगबग कलानगरात सुरू झाली आहे.



कलाकारांनी प्लास्टर ऑफ पॅरिसबरोबरच शाडूच्या मूर्तीही तयार केल्या आहेत. दरम्यान, रंगाबरोबर दुर्गामातेची मूर्ती, सजावटीसाठी आवश्यक असणारे साहित्याच्या दरात वाढ झाल्यामुळे मूर्तीच्या किमतीतही किंचित वाढ होणार आहे.

उरण तालुक्यातील ग्रामीण भागातही गणेशोत्सव संपताच सार्वजनिक नवरात्रोत्सव साजरा करणाऱ्या कार्यकर्त्यांना वेध लागतात ते मूर्ती, रोषणाईसह उत्सवाचे. हा उत्सव असतो आदिशक्ती, आदिमायेच्या पूजन आणि तरुणाईच्या सळसळत्या उत्साहाचा. काही मंडळे तर गणेशोत्सवासाठी घातलेला मंडप काढतच नाहीत. त्याच मंडपात देवीची स्थापना करतात. या उत्सवात फारशी सजावट केली जात नाही. मात्र, विद्युत रोषणाईवर भर दिला जातो. रात्री गीत आणि संगीताच्या तालावर मंडपासमोर तरुणाईचा रास-गरबा, दांडिया रंगतो.

यंदा शाडूच्या मूर्तींचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. अर्थात प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती कमी झाल्या असे नाही. कुंभारवाड्यात मूर्ती तयार करण्याची लगबग सुरू आहे. यावेळी शाडू माती तसेच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या किमतीत काहीशी वाढ झाली आहे. तसेच रंग, मजुरीच्या दरातही वाढ झाल्याने मंडळांना दहा ते १५ टक्के जास्त पैसे मोजावे लागणार आहेत.

## पनवेल महापालिका आयुक्तांचा 'हातभार'

# उपजिल्हा रुग्णालय झाले 'चकाचक'

**। पनवेल । वार्ताहर ।**

पद्मश्री डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयाला अस्वच्छतेच्या गर्तेतून बाहेर काढण्याकरिता सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांनी पुढाकार घेत पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या सहयोगाने व्यापक प्रमाणात स्वच्छता मोहिम राबविली. मात्र, तरीही भिंतीवर पिचकारी मारल्याने रंगरंगोटीचा मुद्दा समोर आला आहे. गुटखा खावून पिचकारी मारणाऱ्यांमुळे रुग्णालयाला मोठा आर्थिक भुर्दंड पडणार आहे.



पनवेलच्या जनतेचा आवाज या व्हॉट्सॲप समूहावर नवीन पनवेल येथील अनेक तरुणांनी चर्चा सुरु ठेवली होती. यामध्ये अनुपम पाटील, आदित्य जानोरकर, अनिकेत, अतिश भोईर, आर्किटेक सुजित, संदिप भोपी, अशोक शेलार, अभिलाश आणि शैलेश भागवत आदी तरुणाईचा सहभाग होता.

उपजिल्हा रुग्णालयात स्वच्छते करिता कर्मचारी उपलब्ध नसल्याने घाणीचे साम्राज्य पसरले असल्याची माहिती समोर आली. शिवाय भूमिगत मजल्यावर शवविच्छेदन केंद्रात कुजत असलेले मृतदेहसुद्धा घाणीचे एक कारण बनले होते.

सर्व बाबींचा आढावा घेत उपजिल्हा रुग्णालयाच्या स्वच्छतेकरिता कांतीलाल कडू यांनी पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांना साकडे घालून स्वच्छतेची मोहिम व्यापक प्रमाणात राबविण्यास सांगितले.

चितळे यांनी उपजिल्हा रुग्णालयाकडून मागणी पत्र हवे असल्याचे कडू यांना सांगितले. त्यानुसार प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक गीते यांनी महापालिका आयुक्त यांना तातडीने पत्र पाठवून स्वच्छतादूत आणि साहित्याची गरज व्यक्त केली. त्या अनुषंगाने उपायुक्त वैभव विधाते, स्वच्छता निरीक्षक शैलेश गायकवाड आदींनी कर्मचाऱ्यांमार्फत स्वच्छता केली.

# दीड दिवसांचे गणपती

विधानसभा निवडणुका जवळ येऊ लागताच राज्य सरकार दणादण निर्णय घेत सुटले आहे. जी कामे गेल्या दोन वर्षात करायला हवी टप्प्याटप्प्याने करायला हवी होती ती एकेका आठवड्यात केली जात आहेत. सोमवारी एका मंत्रिमंडळ बैठकीत ४९ निर्णय घेण्यात आले. त्यापैकी चाळीसच जाहीर करण्यात आले. गेल्या आठवड्यातरही अशाच बैठका झाल्या. कोणालाच नाराज करायचे नाही, सर्वांनाच काही ना काही दिल्यासारखे करायचे हे यातले सूत्र आहे. निवडणुका होईपर्यंत असे अनेक दीड दिवसांचे गणपती मखरात बसवले जाणार आहेत. त्यांची पूजाअर्चा आणि आरत्या होणार आहेत. मतदान संपल्या संपल्या त्यांचे विसर्जन होईल. कालच्या बैठकीत कोतवालांचे मानधन दीड हजाराने तर होमगार्ड्सचा भत्ता दुप्पट वाढवण्यात आला. हे आणि इतरही काही निर्णय स्वागतार्ह असले तरी त्यासाठी निवडणुकीची वाट पाहण्याची गरज नव्हती. ग्रामरोजगार सेवक, अंगणवाडी सेविकांनाही काही अंशी फायदा होणार आहे. या सर्व गटांकडून वेतन वा भत्त्यांमध्ये वाढ करण्याची मागणी अनेक वर्षांपासून चालू आहे. मात्र त्यांच्या तोंडाला वेळोवेळी पाने पुसण्यात आली. एसटी कर्मचाऱ्यांच्या बाबतही हेच घडत असते. सतत टोलवाटोलवी किंवा मागण्यांकडे ढुंकूनही न पाहणे हे चालू असते. यंदाच्या निवडणुका कठीण जाणार असे दिसताच सरकारच्या हृदयाला हे पाझर फुटले आहेत. मात्र मतांवर डोळे ठेवून फुटलेले हे पाझर थोड्याच काळात आटणार आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर अनेक नवनवी कामे लादली जात असतात. त्यासाठी पुरेशा सुविधा मात्र पुरवल्या जात नाहीत. या सेविकांचे बरेच काम हे फोनवर अवलंबून असते. त्यांना नवीन मोबाईल फोन द्यावेत ही त्यांची मागणी आहे. ती काही सरकारला पूर्ण करता येत नाही. त्यासाठी केवळ काही कोटी रुपये लागतील. आधीच श्रीमंत असलेल्या क्रिकेटपटूंवर उधळायला सरकारकडे कोट्यवधि रुपये असतात. पण अंगणवाडी सेविकांसारख्यांचा विषय आला की त्याचा हात आखडता येतो.

### महामंडळांची खैरात

सरकारने वेगवेगळ्या समाजांसाठी महामंडळे स्थापन करण्याची भानगडही पुन्हा सुरू केली आहे. एकेकाळी अण्णाभाऊ साठे किंवा अण्णासाहेब पाटील अशी महामंडळे स्थापन झाली. मात्र तरीही त्या त्या समाजांचा विकास झाला नाही. १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर ही महामंडळे कालबाह्य झाली. त्यांतील बहुतेकांना सरकारने कधीच पुरेसा पैसा दिला नाही. अनेकांना तर कार्यालयासाठी जागाही मिळाली नाही. अध्यक्षांना फुकटचा रुबाब करण्यासाठी एक लाल दिव्याची गाडी आणि काही कर्मचाऱ्यांची तैनाती मात्र करण्यात आली. त्याबाबत सतत ओरडा झाला. त्यामुळे मध्यंतरीच्या काळात हे महामंडळ नावाचे प्रकरण थंडावले होते. पण आता फाटाफुटीच्या राजकारणात पदे कमी आणि इच्छुक व असंतुष्ट उदंड. या सर्वांची सोय लावण्याचे ठिकाण म्हणजे ही महामंडळे. शिवाय, सध्या वेगवेगळ्या समाजांची राखीव जागांची आंदोलने सुरू आहेत. त्यामुळे बारक्या बारक्या समाजांना देखील चुचकारणे सरकारला भाग पडते आहे. त्याचाच एक भाग म्हणून कालच्या बैठकीत आर्य वैश्य समाज आणि सोनार समाजासाठी दोन महामंडळे जाहीर झाली. गेल्या आठवड्यात ब्राह्मण समाजासाठी परशुराम महामंडळ घोषित झाले. याखेरीज गोर बंजारा समाजाच्या विकासासाठी बार्टीच्या धर्तीवर प्रशिक्षण संस्था काढण्याचेही ठरवण्यात आले आहे. अशा रीतीने एकेका समाजासाठी महामंडळे किंवा संस्था स्थापन करण्याचे सत्र सुरु झाले तर शेकडो संस्था निर्माण कराव्या लागतील. आपल्याकडच्या जाति आणि त्यातल्या पोटजातींचे जाळे प्रचंड आहे. या प्रत्येक जातींचे मतदार कुठे ना कुठे एकगठ्टा वा लक्षणीय असणारच. त्यांना खूष करणे हेच जर ध्येय ठेवले तर महाराष्ट्र नावाचे राज्य एक दिवस विसर्जित करावे लागेल. कोणत्याही राज्य सरकारने समाजाच्या सर्व घटकांच्या गरजा लक्षात घेऊन योजना आखणे व विकास करणे अपेक्षित आहे.

### कशाला हवी ही राज्यमाता?

काही घटकांसाठी काही काळ विशेष मदतीची गरज लागू शकते. पण तोच एक नियम केला आणि प्रत्येक जात वा समाजासाठी विकासाचा वेगळा पाट काढायचा ठरवला तर मूळ कालव्यात पाणी शिल्लक राहणार नाही. शिवाय इतके करूनही या समाजांचा विकास होणारच नाही. कारण त्या सर्वांना कोणतेही सरकार कधीच पुरेसा निधी देऊ शकणार नाही. शिवाय भटजींना दक्षिणा वाटल्यासारखी असा थोडा थोडा दानधर्म करणे म्हणजे विकास नव्हे. कालच्या बैठकीत देशी गायीला राज्यमाता असा दर्जा देण्याचाही निर्णय झाला. हाही अशाच प्रकारचा आहे. ज्यांनी जन्मात कधी गायी पाळल्या नाहीत असे मूर्ख लोकच गायीला गोमाता वगैरे म्हणून तिला मखरात बसवू शकतात. गायीला हिंदू परंपरेत एक विशेष स्थान आहे हे खरे. पण शेतकऱ्यांसाठी त्यांची सर्वच गुरे ही प्राणप्रिय असतात. त्यांची जमेल तशी देखभाल ते करीत असतातच. पण गोहत्याबंदीचा बडिवार करून जेव्हापासून कायदा कडक करण्यात आला आहे तेव्हापासून शेतकऱ्यांना भाकड गायी किंवा कोणतीही जनावरे बाळगणे हे मोठे संकट वाटू लागले आहे. त्यांची विक्री करण्यात अडचणी येतात. त्यामुळे गुरे नसलेलीच बरी असा कल वाढतो आहे. २०१९ मध्ये राज्यातील देशी गायींची संख्या ४६ लाख होती व ती आधीच्या गणनेपेक्षा वीस टक्क्यांनी कमी झाली होती. याचे थेट कारण हे गोहत्याबंदीची विकृत अंमलबजावणी हे आहे. गायींचे मांस असल्याच्या नुसत्या संशयावरून हत्या केल्या जात असतील अशा काळात कोण शेतकरी ही नसती जोखीम आपल्याकडे ठेवेल? आता गायींना राजमातेचा दर्जा देऊन काहीतरी धर्माचे काम केल्याचा आभास निर्माण केला जाणार आहे. शिवाय गोशाळांना दर गायींमागे अनुदान म्हणून वर्षाला सुमारे दोनशे कोटींचे वाटप होणार आहे. या गोशाळा कोणाच्या आहेत व हे पैसे नक्की कोणाच्या खिशात जातील हे वेगळे सांगण्याची गरज नाही. पुन्हा सत्तेत येण्यासाठी महायुतीवाले काय वाटेल ते आणि सुचतील ते उपाय करीत आहेत.

विचार

# पितृरुणांतून उतराईचा काळ

*मानवी आयुष्य सोहळ्यांच्या हिंदोळ्यांवर झुलत असतं. कृतज्ञता व्यक्त करण्याच्या सोहळ्याला भारतीय संस्कृतीने अग्रस्थान दिलं आहे. जीवजंतूंसोबतच मृतात्म्यांबाबतही कृतज्ञता व्यक्त करण्याची रीत संस्कृतीने घालून दिली आहे. स्मरण करणं, उपकारांमधून उतराई होण्याचा प्रयत्न करणं या हेतूने पितृपक्ष पंधरवडा पाळला जातो. अलिकडेच सुरु झालेल्या पितृ पंधरवड्यानिमित्त या प्रथेमध्ये कालानुरूप होणाऱ्या बदलांचा हा मागोवा.*



**आरती देशपांडे**

उदय आणि अस्त हा सृष्टीचा नियम आहे. याच नियमानुसार ज्याचा जन्म झाला आहे त्याचा मृत्यू अटळ असतो. पुराणकथांमध्ये किंवा तत्वज्ञानामध्ये मृत्यूचा उल्लेख अंतिम सत्य असा केला जातो. ८४ लक्ष योनींमधून फिरून थकून-भागून आल्यानंतर व्यक्तीला मानवी जन्म मिळतो असं म्हणलं जातं. त्यामुळे ८४ लक्ष जन्मांनंतर मिळणाऱ्या जन्मावर माणसाचं अतीव प्रेम असतं. आयुष्याच्या या अतीव ओढीमुळेच त्याला मृत्यूची द्वेषयुक्त भीती असते. मृत्यूबाबत इतकं भय मानवाच्या मनात असण्याचं कारण म्हणजे मृत्यूनंतरच्या आयुष्याबाबतची संदिग्धता. मृत्यूनंतर आयुष्य कसं असेल, याबाबत आजपर्यंत फक्त कल्पनाच लढवल्या गेल्या आहेत. त्याला कोणताही पुरावा नाही. याच कारणामुळे व्यक्तीला मृत्यूपश्चात असणाऱ्या आयुष्याचं गूढ कुतुहल आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान या सर्व कथांना नाकारत असलं तरी मानवी कल्पनाशक्तीच्या जोरावर मानवाने मृत्यूपश्चात असलेल्या विश्वाची कल्पना केली आहे.

महत्प्रयासाने मिळालेलं आयुष्य निती-नियमांच्या रेषेवरून सुस्थितीत चालावं यासाठी पुर्वजांनी मानवी वर्तणुकीचे नियम लिखित स्वरूपात घालून दिले. यालाच उपनिषदं, वेद, पुराण अशा नावांनी संबोधलं गेलं. या रूपरेषेवरून चालणं हे काही काळासाठी शक्य असलं तरी स्वत:ला सदा सर्वकाळ या नियमांमध्ये बांधणं शक्य नसतं. अशा वेळी या नियमांचा गरजेपुरता संदर्भ घेतला जातो आणि कार्य पार पाडलं जातं.

स्वातंत्र्य आणि प्रलोभनं यांच्यामध्ये मानवी मन गुरफटत जातं आणि म्हणूनच अंतिम सत्याकडे डोळेझाक होऊ लागते. विषयवस्तूंच्या गराड्यात असलेला मानव बुद्धीसामर्थ्याच्या जोरावर उत्तम आरोग्य सुविधा निर्माण करतोच पण मृत्यूला जिंकण्याचेही मनसुबे रचतो. आयुष्यभरात जोडलेले आसपासचे नातेसंबंध त्याला अंतिम क्षणी मोहात पाडतात. आयुष्याच्या कातरवेळी तो गतकाळातील स्मृतींमध्ये रममाण होताना दिसतो. मृत्यूनंतर आपण सगे-सोयऱ्यांपासून लांब जाणार आहोतच, याशिवाय हा प्रवास आपल्याला एकट्याने करावा लागणार या जाणिवेने तो जास्त अस्वस्थ होत राहतो. डोळ्यासमोर घडलेला एखादा मृत्यूची दृश्यं त्याची पाठ सोडत नाहीत.

मानवी जीवनातल्या प्रत्येक महत्वाच्या घटनेचे सोहळे साजरे केले जातात. या सोहळ्यात मृत व्यक्तीच्या संदर्भात असलेल्या सोहळ्यांचाही समावेश असतो. दु:खाची किनार असणारा हा सोहळा प्रियजनांच्या मरणोत्तर शांतीसाठी जड अंत:करणाने का होईना, पार पाडला जातो. भारतीय संस्कृतीमध्ये जिवंत व्यक्तीबरोबरच मृतात्म्यांच्या भावनांचाही विचार केला जातो. पितरांनी त्यांच्या मृत्यूनंतरही आपल्यावर कृपा करत रहावी, गूढ संदेशांद्वारे अप्रत्यक्षरित्या का होईना, आपल्याला मार्गदर्शन करत रहावं, त्यांना सुग्रास भोजनाचा नैवेद्य दाखवून तृप्त करुन आशीर्वाद मिळवावेत आणि पुढची वाटचाल करावी या साध्या आणि सहज विचारसरणीतून पितृपक्षात घरातील मृत व्यक्तींसंबंधीची पितरकर्मं करण्याची प्रथा निर्माण केली गेली असावी.

भारतीय संस्कृतीत मृत्यूनंतरच्या प्रवासाची संकल्पना गृहित धरली आहे. या संकल्पनेमुळेच मृत व्यक्तीचं श्राद्ध करणं, त्यांना तर्पण करणं या प्रथा आढळतात. भाद्रपदातला कृष्णपक्ष हा श्राद्धपक्ष किंवा पितृपक्ष मानला जातो. या पंधरवड्यात आपल्या पूर्वजांचं, पितरांचं स्मरण करून ते ज्या योनीत असतील तिथं सुख-शांती मिळावी म्हणून प्रार्थना केली जाते. धार्मिक कृत्यांच्या प्रथेनुसार श्राद्धाच्या दिवशी पितृदान तर्पण केलं जातं. या कार्यानिमित्त घरातील सगळे एकत्र येतात, एकत्र बसून दोन घास खातात. यशाशक्ती दानकर्म पार पडतं. हयात नसलेल्यांच्या आठवणी निघतात. एक प्रकारे हा पांगलेल्या कुटुंबाला एकत्र आणण्याचा उपचारही ठरतो. आता हयात नसलेल्या शरीरांनी पूर्वी या आप्तेष्टांमधील दुवा म्हणून काम केलेलं असतं. त्यांनी कुटुंबाची ही मोळी बांधून ठेवलेली असते, मोळी एकत्र टिकवून ठेवलेली असते पण गाठ सैल होताच मोळीतली काष्ठ विखुरण्यास वेळ लागत नाही. कदाचित हीच अप्रिय बाब टाळण्यासाठी आणि घरातील सर्वांना आपल्या मूळ वृक्षाच्या सयीच्या सावलीत पुन्हा एकत्र आणण्यासाठी या कर्माचं प्रयोजन असावं. कारण अगदी आत्ता-आत्तापर्यंत लोक एक वेळ सणाला एकत्र येत नसत पण घरातील पितृकर्माला आवर्जून उपस्थित रहात असत. देवाच्या आशीर्वादाबरोबरच पितरांचा आशीर्वाद महत्त्वाचा अशी आजही अनेकांची प्रबळ धारणा आहे. ही धारणा काही देवो अथवा न देवो, घराला एकत्र बांधून ठेवते याबाबत मात्र शंका घेऊ नये. या पंधरवड्याच्या कालावधीत अनेक धार्मिक बाबी पार पाडल्या जातात. त्यात बरेचदा अवास्तव कर्मकांडांची मिसळ केली गेल्याने मूळ हेतू बाजूला पडण्याची शक्यता असते. सध्याच्या वेगवान युगात प्रत्येकाचा या सर्व कृतींवर विश्वास असेलच किंवा त्यासाठी पुरेसा वेळ देणं शक्य होईलच असं नाही. ज्यांनी आपल्याला लहानाचं मोठं करण्यासाठी खस्ता खाल्या, मोहांना टाळून कसं पुढं जावं याचा आदर्श घालून दिला त्या आपल्या पूर्वजांबद्दल, पितरांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणं, त्यांना समाधान होईल असं आचरण करणं हा पितृपक्षाचा मूळ हेतू असतो. पितरांच्या उपकारांची उतराई होण्याचा सोहळा म्हणजे पितृपक्ष पंधरवडा होय. पितरांचं एखादं अपुरं ध्येय पुत्राने अगर कन्येने पूर्ण करण्याची जबाबदारी आनंदाने स्वीकारल्याने पिता अगर माता निश्चितपणे संतुष्ट होतील. हे करत असताना पुत्राला अगर कन्येलाही समाधान मिळेल. पितरांची आठवण करण्याचे हे दिवस पवित्र मानले पाहिजेत. आपल्यालाही पितरांप्रमाणे एक दिवस जायचं आहे, याचं भान याच दिवसात मनावर ठसलं जातं. या भूतलावर आपल्याला मिळणारा वेळ विधायक कामांसाठी वापरावा याचं भान येतं. या श्राद्धपक्षात सत्कृत्याचे पाथेय बांधण्याची मनाची जिद्द वाढते. एकदा सत्कृत्याचे पाथेय बांधण्याचा निश्चय केला की जीवन अधिकाधिक क्रियाशील बनतं. कदाचित हा धडा देण्यासाठी या पंधरवड्याचं प्रयोजन केलं असावं.

बरेचदा पितृ पंधरवड्याचा हा काळ अनिष्ट समजला जातो. या काळात नवी खरेदी, मंगल कार्याचा शुभारंभ केला जात नाही. समाजातला एक वर्ग अजूनही या काळाला नाकं मुरडतो. पण हळूहळू समाजाच्या समजुतीत बदल घडू लागला आहे. समाज जुन्यासोबत नव्या विचारांची गुंफण करून नवी विचारधारा प्रवाहीत करत आहे. त्यामुळे या काळातही काही नवीन कामांचा श्रीगणेशा होतो. अगदी मोठी खरेदी होत नसली तरी बाजारातील कमी वर्दळ, मागणीअभावी कमी पातळीवरील भाव यांचा लाभ घेण्यासाठी पुढच्या उत्सवकाळातील खरेदी करण्यासाठी या पंधरवड्याचा काळ उचित समजला जातो. या कार्यक्रमांचा अधिक गाजावाजा न करता आवश्यक ते उपचार करुन दिनक्रम सुरू ठेवणं ही आजची गरजच आहे. त्यामुळे बऱ्याच घरांमधून कर्मकांडाचा अतिरेक न करता विशिष्ट तिथीला दानधर्म करणं, वृद्धाश्रमात अथवा अनाथालयात अन्नदान वा इतर वस्तूंचं दान करणं, गरजू विद्यार्थ्यांना मदत करणं ही स्त्युत्य कर्मं पार पाडली जातात. समजुतीने घेतलेलं हे चांगलं वळण आहे असं म्हणावं लागेल.

जैवसाखळीतील एक उपयुक्त जीव म्हणून या काळात कावळ्याचं महत्त्व न नाकारता अशा वेगळ्या पद्धतीने केलेलं दानही पितरांना संतुष्ट करत असेल याची खात्री वाटते. शेवटी माणूस महत्त्वाचा असतो. आपल्यातून गेलेल्या व्यक्तीचं मरणोत्तर जग आभासी आहे, आपल्या कल्पनेच्या पलीकडलं आहे. त्याला ओढून ताणून आपल्या जगात आणण्यापेक्षा या जगात, आपल्याबरोबर राहणाऱ्या पण जाणिवा मृतवत झालेल्या लोकांच्या आयुष्यात आशेचा एक किरण आणणं हे पितरकर्म नसेल कदाचित, पण मनुष्यकर्म नक्कीच आहे. या आयुष्यात मनुष्य म्हणून जगताना मनुष्यकर्म करणंही पुरेसं आहे. हे करत राहिलं तर आयुष्याच्या अखेरीस संध्याछाया दाटून आली तरी जीव कासावीस होणार नाही, काय केलं या सोन्यासारख्या आयुष्यात, असा व्यथित करणारा प्रश्न भेडसावणार नाही. संधी असूनही लोकांशी चांगलं वागू शकलो नाही ही खंत त्रास देणार नाही. उलटपक्षी, यमदूताच्या स्वागताला तनाबरोबर मनानंही आपण सिद्ध असू. मिळालेल्या आयुष्याबद्दल कृतार्थता आणि आत्तापर्यंत केवळ कथांमधून ऐकलेल्या स्वर्गनगरीच्या प्रवासाला सिद्ध असू. हे शक्य झालं तर आपल्या आत्म्याला संतुष्ट करण्यासाठी पुढच्या पिढीतील कोणालाच कर्मकांडाची मदत घ्यावी लागणार नाही.

आजकाल

# विधानसभेच्या १२ जागांबाबत तडजोड नाही : मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

**डॉ. उदय नारकर**

येत्या विधानसभा निवडणुकीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने राज्यभरात पक्षाचे व जनसंघटनांचे मजबूत काम असलेल्या आणि प्रदीर्घ व यशस्वी लढे केलेल्या केवळ १२ जागांची मागणी महाविकास आघाडीकडे केली आहे. इतर डाव्या व पुरोगामी पक्षांनीही आपला प्रभाव असलेल्या मर्यादित जागांची मागणी केली आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते श्री. शरद पवार, श्री. जयंत पाटील, श्री. उद्धव ठाकरे, श्री. नाना पटोले, श्री. बाळासाहेब थोरात यांची भेट घेऊन याबाबत आपली भूमिका दोन महिन्यांपूर्वीच स्पष्ट केली होती, आणि आपण लढणार असणाऱ्या १२ जागांची यादी या सर्व नेत्यांना तेव्हाच लिखित स्वरूपात सादर केली होती.

महाविकास आघाडीने या १२ जागा माकपला सोडाव्यात व त्यानंतरच उर्वरित जागांच्या बाबत आपसात वाटाघाटी कराव्यात अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केली होती. महाविकास आघाडीतील प्रमुख तीन पक्ष मात्र माकप व डाव्या पुरोगामी शक्तींना गृहीत धरून जागावाटपाबाबत आपसात चर्चा करत आहेत. इतर डावे पक्ष व पुरोगामी शक्तींना अद्याप या प्रक्रियेत सामावून घेण्यात आल्याचे दिसत नाही. महाविकास आघाडीच्या अंतर्गत एकजुटीसाठी हे घातक आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये सुद्धा महाविकास आघाडीने लोकसभेच्या महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व ४८ जागा तीन मुख्य पक्षांमध्ये वाटून घेतल्या व त्यानंतर इतर पक्षांच्या बरोबर त्यांचा केवळ पाठिंबा मिळवण्यासाठी चर्चा केली. माकपने तेव्हाही महाविकास आघाडीच्या प्रमुख पक्षांचे हे असे करणे चुकीचे असल्याबद्दल आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांच्या लक्षात आणून दिले होते. किमान विधानसभेच्या जागावाटपात तरी अशा प्रकारे आपसांत तीन पक्षांनी जागा वाटून घेऊन नंतर डावे पुरोगामी पक्ष व संघटनांबरोबर चर्चा सुरू करण्याची चूक होणार नाही याची काळजी घेण्याबद्दल विनंती केली होती. मात्र लोकसभेच्या वेळेस जे झाले तेच विधानसभेच्या वेळेस घडताना आज दिसत आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, इतर डावे पुरोगामी पक्ष व विविध जनसंघटनांनी शेतकरी, शेतमजूर, कामगार, विद्यार्थी, युवक व महिलांच्या बाबतच्या विविध प्रश्नांवर सत्ताधारी भाजप व त्याच्या मित्रपक्षांच्या विरोधात वर्षानुवर्ष तीव्र संघर्ष केला आहे. जनतेच्या या संघर्षांमधून पुढे आलेल्या मागण्या व डावे पक्ष विविध प्रश्नांबाबत घेत आलेली धोरणे यांचे प्रतिबिंब महाविकास आघाडीच्या किमान समान कार्यक्रमात उमटावे असा आग्रहही पक्षाच्या वतीने महाविकास आघाडीच्या शिरस्त नेत्यांकडे लावून धरण्यात आला होता. मात्र याबाबतही कोणताही सकारात्मक प्रतिसाद अद्याप देण्यात आलेला नाही.

दुसऱ्या बाजूला हे प्रमुख तीनही पक्ष वेगवेगळ्या संवाद यात्रा, सभा व प्रसार माध्यमांमधील चर्चेच्या माध्यमातून माकपने व इतर डाव्या पक्षांनी लढवण्यासाठी सादर केलेल्या जागांवर आपले उमेदवार प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे केंद्रस्थानी आणत आहेत. महाविकास आघाडीतील या तीन पक्षांची ही कृती समन्वयाच्या व एकजुटीच्या प्रक्रियेस बाधा आणणारी आहे.

लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीतील सर्व पक्ष, विविध जनसंघटना, वर्गीय संघटना, पुरोगामी विचारवंत, पत्रकार, बुद्धिजीवी या सर्वांनी अपार मेहनत घेऊन राज्यात महाविकास आघाडीच्या बाजूने वातावरण तयार केले होते. तेव्हा सर्वांनी आपली संपूर्ण ताकद लावली होती. परिणामी महाराष्ट्रात लोकसभेच्या निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले. मात्र असे असले तरी महाविकास आघाडी व महायुती मधील मतांचे अंतर पाहता डाव्या शक्ती, विचारवंत, लेखक, विविध जनसंघटना, वर्गीय संघटना यांना दूर ठेवून महाविकास आघाडीला विधानसभा निवडणूक जिंकता येईल असे आकलन करणे अतिआत्मविश्वासाचे ठरू शकते.

देशाच्या जनतेत फूट पाडून जनविरोधी, धर्मांध, जातीय, भ्रष्ट व हुकूमशाही राजकारण करणाऱ्या भाजप व त्याच्या मित्रशक्ती संविधानाला व भारताच्या एकतेला धोका निर्माण करू पाहत आहेत. अशा पार्श्वभूमीवर संविधान, लोकशाही, धर्मनिरपेक्षता व भारतीय जनतेच्या हितरक्षणासाठी सर्व लोकशाहीवादी शक्तींची एकजूट अत्यंत आवश्यक बनली आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये ही एकजूट जास्त बळकट व्हावी यासाठी महाविकास आघाडीच्या नेतृत्वाने अत्यंत काळजीपूर्वक पावले टाकण्याची आवश्यकता आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या पार्श्वभूमीवर जाहीर मागणी करतो की विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपाच्या प्रक्रियेत महाराष्ट्रातील सर्व डावे व लोकशाहीवादी पक्ष व पुरोगामी संघटनांना महाविकास आघाडीने तातडीने सामावून घ्यावे. निवडणूक लढण्याबद्दल त्यांचे आग्रह अत्यंत प्रामाणिकपणाने विचारात घेतले जाऊन सर्वसमावेशक भूमिका घ्यावी. मात्र तसे झाले नाही तर निर्माण होणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी डावे पक्ष व पुरोगामी शक्तींना गृहीत धरणाऱ्यांची असेल.

**- राज्य सेक्रेटरी**

लोकसंसद

## मिथुनदांचे अभिनंदन!

भारतीय चित्रपटसृष्टीत अतुलनीय आणि संस्मरणीय योगदानासाठी देण्यात येणारा सर्वोच्च दादासाहेब फाळके पुरस्कार यंदा मृगया, सुरक्षा, डिस्को डान्सर, अग्निपथ यासारख्या लक्षवेधी चित्रपटांमधून वैविध्यपूर्ण भूमिका साकारणारे ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना जाहीर झाला आहे. कोलकाता येथे १६ जून १९५० रोजी जन्मलेल्या मिथुन चक्रवर्ती यांचे मूळ नाव गौरांग चक्रवर्ती असे होते. बंगाली, हिंदी, भोजपुरी, तमिळ, तेलगू, कन्नड आणि पंजाबी भाषेत ३५०हून अधिक उत्तमोत्तम सिनेमे केलेल्या मिथुन चक्रवर्ती यांनी 'दो अंजाने' सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. त्यानंतर 'तेरे प्यार में', 'प्रेम विवाह', 'हम पांच', 'डिस्को डान्सर', 'हम से है जमाना', 'घर एक मंदिर', 'अग्निपथ', 'तितली', 'गोलमाल ३', 'खिलाडी ७८६' आणि 'द ताशकंद फाइल्स' यांसारख्या अनेक सिनेमांमधून त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. 'डिस्को डान्सर' या १९८२ मधील चित्रपटामुळे मिथुन चक्रवर्ती लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचले. १०० कोटी क्लबमध्ये गेलेला हा हिंदी सिनेसृष्टीतीला पहिला चित्रपट ठरला आहे. त्यांना तीन वेळा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि दोनदा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला आहे. मिथुन चक्रवर्ती यांना प्रेमाने मिथुनदा असेही म्हटले जाते. तो काळ अँग्री मन, सुपरस्टार अमिताभ बच्चन यांचा होता. त्याचवेळी मिथुन चक्रवर्तींना मिळालेल्या यशामुळे त्यांना 'गरिबांचा अमिताभ' असे संबोधले जात होते. दादासाहेब फाळके पुरस्कारप्राप्त मिथुनदांचे हार्दिक अभिनंदन!

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२ ऑक्टोबर**

**१८८३ :-** कादंबरीकार बाळकृष्ण संतुराम गडकरी यांचा जन्म. 'महाराष्ट्र वाग्विलास' या मासिकाचे ते संस्थापक. 'दुर्देवी प्रेमयोग', 'विजया कोणास मिळाली?', 'गृहिणी', 'शालिनी', 'सौंदर्यदर्शनन' या कादंबऱ्या आणि 'संगीत पत्रिका' हे नाटक त्यांनी लिहिले. **१९०७:-** प्रकाशक हरीभाऊ विष्णू मोटे यांचा जन्म. मोटे प्रकाषनाचे संस्थापक असणाऱ्या मोट्यांनी 'प्रतिभा' या पाक्षिकांची जबाबदारी सांभाळली. 'एक सर्वमंगल क्षिप्रा' हे आत्मचरित्रही त्याचेच. **१९०८ :-** विचारवंत गंगाधर बाळकृष्ण सरदार यांचा जन्म. ज्ञानदेवांपासूनच्या मराठी संतवाङ्:मयातील जीवननिष्ठा त्यांनी दाखवून दिली. तसेच न्या. रानडे, म. फुले आणि आगरकर यांच्या विचारांचा परामर्ष घेतला. समाजाच्या सर्व अंगांकडे पाहणाऱ्या वैचारिक दृष्टीने गं.बा यांनी लिखाण केले. त्यांचे निधन १९८८ मध्ये झाले, त्यापूर्वीच्या दशकभरात त्यांनी दलित साहित्याचे स्वागत का झाले पाहिजे, याबद्दल स्पष्ट भूमिका मांडली होती. गं. बा.यांचे संत साहित्यावर अनेक ग्रंथ प्रकाशित झाले. त्यामध्ये 'तुकाराम दर्शन', 'ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा', 'रामदास दर्शन', 'एकनाथ दर्शन' तसेच 'प्रबोधनातील पाऊलखुणा', 'नव्या युगांची स्पंदने', 'परंपरा आणि परिवर्तन' या ग्रंथातून त्यांनी बदलत्या काळातील विचारांचा वेध घेतला. याशिवाय 'महाराष्ट्र जीवन खंड १, २', 'संक्रमण काळाचे आव्हान' ही संपादित पुस्तके 'अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका', 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी', 'आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार', 'गांधी आणि आंबेडकर' आदी ग्रंथातून त्यांनी सामाजिक सुधारणेचा वेध घेतला. त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्ये म्हणजे समाजप्रबोधन, समाजप्रगती आणि ज्ञानेश्वरांपासून फुले आंबेडकरांच्या काळाचे तसेच दलित आदिवासी यांच्या चळवळीपर्यंतचे सुक्ष्म निरीक्षण हे वैशिष्ट्य. **१९११:-** मुद्रण प्रकाश आणि मुद्रा या नियतकालिकांतून व्यावसायिक लेखन करणारे लेखक यशवंत एकनाथ धायगुडे यांचा जन्म. **१९१७ :-** कथा-कादंबऱ्या, अनुवादक यमुना शेवडे यांचा जन्म. 'प्रेमपत्र व इतर कथा', 'हरवलेला गवसला' हा कथासंग्रह. 'जीवनसंगीत', 'पूर्णाहुती' या कांदबऱ्या, तर 'ज्वालामुखी', 'झाशीची राणी लक्ष्मीबाई' हे अनुवाद आणि 'साथसंगत' हे आत्मवृत्त प्रसिध्द. **१९२८:-** नाटक, निबंध, गोष्टी आदी विषयाचे लेखक सीताराम रघुनाथ अधिकारी यांचे निधन. 'हिंदुधर्म', 'स्वदेश' या दृष्टीकोनातून लेखन. 'माणसाने कसे वागावे' या विषयीचा 'श्रीसर्वसारदर्पण' ह्या ग्रंथाषिवाय 'चमत्कारिक स्वप्न' तसेच 'आर्यधर्मद्दढीकरण' या ग्रंथातून धार्मिकसुधारणांवरील उपाययोजन आणि विचार शिरोमणी' हे विविध विषयांवरील निबंधाचे पुस्तक त्यांनी लिहिले. 'वसुंधरा व पृथ्वीराज' या काल्पनिक नाटकातून 'एतद्देशियांच्या निकृष्ट अवस्थेला कोणती कारणे घडली' याचे विवेचन तर 'विकृत पृथ्वीपर्यटन भाग १,२' हा अद्भूत रम्य साहसकथांचा संग्रह' इ. पुस्तक प्रसिध्द. **१९५३ :-** लेखक फ्रांसिस सायमन लोपिस यांचा जन्म. 'स्वप्न' या कथासंग्रहासह 'दर्शन', 'वचन', 'खलनायक' ह्या कादंबऱ्या त्यांच्या प्रकाषित झाल्या आहेत. याशिवाय 'खंगार', 'नातं', 'नातीशी', 'नकोशी' ही पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. **१९५६:-** लेखक डॉ. भगवान सावंत यांचा जन्म. ह्यांच्या प्रकाशित साहित्यात 'वाऱ्यावरल्या लाटा', 'परिघातल्या परिघात' हे ललित तर 'माझी माणसं','नाही पुन्हा भेटी' हे व्यक्ति चित्रात्मक, 'षब्द संपदा' हे वक्तृत्व कलेसंबंधी, 'व्यक्तिमत्व विकास' हे शालेय आणि 'शाहिरी कवितांचा चिकित्सक अभ्यास' हा त्यांचा प्रबंध पुस्तक रुपात प्रबंध. **१९८२:-** ब्रिटिश अमदानीत रिझर्व बँकेचे गर्व्हनर पद भुषवलेले केंद्रिय अर्थमंत्री आणि मराठी साहित्यावरही आपला प्रभाव पाडणारे लेखक अर्थतज्ञ सी. डी. देशमुख यांचे निधन. मॅट्रिक परीक्षेत मानाची जगन्नाथ शंकरषेठ संस्कृत षिष्यवृत्ती फटकवणाऱ्या देशमुख यांनी पुढे कालिदासाच्या 'मेघदूत' या खंडकाव्याचे मराठीत भाषांतर केले. तसेच गांधींजीच्या १० सुवचनांचा' संस्कृतमध्ये अनुवाद तसेच त्यांच्या भाषणांचे दोन खंड प्रसिध्द.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ ऑक्टोबर

१) श्री.अलीम सतार शेख श्रीबाग-२, अलिबाग,

२) श्रीम. मदुरा मदन मोरे बाजारपेठ, अलिबाग,


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

### आजचे अन्नदाते



एक सद् गृहस्थ, अलिबाग

श्री. विजय गयबु चव्हाण, अलिबाग

कै. दत्तात्रय पाराजी शेवाळे, स्मरणार्थ अलिबाग

कै. पंडितराव कुलकर्णी, स्मरणार्थ, कुरुळ, अलिबाग



अमृतबेन प्रेमजी जैन, स्मरणार्थ अलिबाग

शिल्पा प्रताप गंभीर, अलिबाग


# माझी वसुंधरा सर्वेक्षणात श्रीवर्धन प्रथम

## ■ शासनाकडून ७५ लाखांचे बक्षीस जाहीर

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

**पर्यावरण व वातावरण बदल विभागाने पंचतत्वाचे संवर्धन, संरक्षण व जतनकरून शाश्‍वत विकास साधण्यासाठी सुरु केलेले 'माझी वसुंधरा अभियान ४.०'मध्ये श्रीवर्धन नगरपरिषदने सहभाग घेतला होता. या अभियानातील सर्वोत्कृष्ठ कामगिरी केलेल्या नगरपरिषदांचा दि. २७ सप्टेंबर रोजी निकाल जाहीर झाला असून श्रीवर्धन नगरपरिषदेने महाराष्ट्र राज्यात १३ वा क्रमांक पटकावला आहे. तसेच, १५ हजार ते २५ हजार या लोकसंख्येच्या प्रवर्गामध्ये कोकण विभागात पहिला क्रमांक पटकाविला असून शासनाकडून तब्बल रु. ७५ लाखाचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. लवकरच महाराष्ट्र शासन स्तरावर सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक आणि रक्कम बक्षीस स्वरूपात वितरीत केली जाणार आहे.**

माझी वसुंधरा अभियान हे दरवर्षी संपूर्ण राज्यात राबविण्यात येते. याअंतर्गत भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या पंचमहाभूतांच्या आधारे विविध घटकांची




तपासणी केली जाते. यात शहरात एकूण राबविण्यात आलेले वृक्षारोपण व पूर्वी लावण्यात आलेल्या वृक्षांचे संवर्धन, तसेच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात तयार होणाऱ्या सेंद्रिय खतास 'हरित महासिटी कंपोस्ट' हा शासनाचा नोंदणीकृत ब्रँड प्राप्त असणे, सौरउर्जा प्रकल्प, शहरातील सुशोभीकरण आणि हरित क्षेत्रांची, जल स्त्रोतांची निगा राखणे अशा नानाविध उपक्रमांची तपासणी शासनामार्फत त्रयस्थ संस्थेद्वारे केली जाते. तसेच, शहरातील नागरिकांकडून सर्वेक्षण दरम्यान प्रतिक्रिया घेण्यात आल्या होत्या.

गेल्यावर्षी माझी वसुंधरा अभियान सर्वेक्षणात श्रीवर्धन शहराला कोकण विभागातून दुसरे मानांकन मिळाल्याने यशाने थोडक्यात हुलकावणी दिली होती. परंतु, अथक प्रयत्न व सातत्यातून नगरपरिषदेने यावर्षी प्रथम क्रमांक पटकावून मागील कसूर भरून काढली आहे. श्रीवर्धन नगरपरिषदेची माझी वसुंधरा अभियानातील ही आत्तापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे. पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेले श्रीवर्धन आता स्वच्छतेच्या कामगिरीत देखील अग्रेसर झाल्याचे दिसून येत आहे. याचप्रमाणे मा. मुख्याधिकारी विराज लबडे यांच्या कल्पनेतून श्रीवर्धन शहरामध्ये नगरपरिषदेने शहर सौंदर्यीकरण अंतर्गत विविध ठिकाणी काम केल्याचे दिसून येत आहे.

या सर्वेक्षणात संपूर्ण राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती सहभागी झालेले होते. या अभियानात श्रीवर्धन नगर परिषदेने उच्चतम कामगिरी केलेली आहे. यासाठी नगरपरिषदेच्यावतीने मुख्याधिकारी विराज लबडे यांनी या अभियानासाठी नेमणूक करण्यात आलेल्या समग्र कन्सल्टनसी, सर्व नागरिक, नप कर्मचारी व अधिकारी वर्गाचे स्वच्छता ठेकेदाराकडील कर्मचारी वर्गाचे देखील अभिनंदन केले आहे.

# मोफत अस्थिरोग, फिजिओथेरपी शिबीर संपन्न




**। खांब । वार्ताहर ।**

दीपक फाऊंडेशन आणि दीपक नायट्राईट यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतखार येथे मोफत अस्थिरोग आणि फिजिओथेरपी शिबीर २६ सप्टेंबर रोजी घेण्यात आल होते. या शिबिरात डॉ. प्रशांत गोसावी, कीर्ती कुलकर्णी यांनी रुग्ण तपासणी करून त्यांना योग्य ते मार्गदर्शन करून व उपचार देण्यात आले. या शिबिराचे नियोजन दीपक फाऊंडेशनचे अजय आवाडे, डॉ. प्रियंका नरवणकर, अक्षरा जाधव, अश्विनी एत, सेजल घोरपडे यांनी केले. यावेळी ११० रुग्णांची तपासणी करून त्यांना औषध उपचार करण्यात आले. या शिबिराला सरपंच, उपसरपंच, सदस्य, कर्मचारी तसेच ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. दरम्यान, दीपक फाऊंडेशन आणि दीपक नायट्राईट यांनी राबविलेल्या या आरोग्य विषयक कार्यक्रमाबद्दल यशवंतखार ग्रामस्थांनी धन्यवाद दिले आहेत.

# विज्ञान खेळणी बनविण्याचा उपक्रम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जतएज्युकेशनसोसायटीच्या कडाव इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मुंबई विज्ञान परिषद यांच्या माध्यमातून विज्ञान खेळणी बनविण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांना शाळेतील माध्यमिक विभागातील पूर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सुरवातीला मुख्याध्यापिका वृषाली वैद्य यांनी मुंबई विज्ञान परिषदेकडून आलेल्या प्रशिक्षकांची ओळख करून दिली. यानंतर विद्यार्थ्यांना खेळणी संच बनविण्याचे साहित्य देण्यात आले. मुंबई विज्ञान परिषदेकडून नेमण्यात आलेल्या प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना विज्ञान खेळणी बनविण्यास शिकविले गेले. या कार्यशाळेत १२४



विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी मुलांनी आनंदाने खेळणी तयार केली. या उपक्रमामुळे शाळेमधील विज्ञानाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारची विज्ञान खेळणी बनवून विज्ञान अधिक सोपे करून घेण्याचा प्रयत्न केला.

# सुलोचना शिंदे यांचे निधन

**। खांब । वार्ताहर ।**



रोहा तालुक्यातील शिरवली गावच्या रहिवाशी असणाऱ्या सुलोचना नंदू शिंदे यांचे शुक्रवारी दि.२७ सप्टेंबर रोजी निधन झाले. निधनासमयी त्या ७५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुलगे, एक मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. सुलोचना यांचे दशक्रियाविधी व अंतिम धार्मिकविधी रविवारी (दि.६) शिरवली येथील निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# शाळेसाठी शैक्षणिक साहित्याची भेट



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागात शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या श्री साई ट्रस्ट नवी मुंबई यांच्याकडून तालुक्यातील दोन जिल्हा परिषद शाळांसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यात संवाद आणि वाकस येथील जिल्हा परिषद शाळेला विद्यार्थी उपयोगी साहित्य भेट देण्यात आले.

नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्ट यांच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या ट्रू वर्शिप संस्थेच्या वाकस येथील जिल्हा परिषद शाळेसाठी एलईडी संच, शालेय शैक्षणिक साहित्य, ऑफिस खुर्च्या भेट देण्यात आल्या. तर, सलवड येथील जिल्हा परिषद शाळेसाठी ऑफिस कपाट, धान्य कोठ्या, खुर्च्या, शालेय विद्यार्थ्यांना उपयुक्त साहित्य भेट देण्यात आले. यावेळी ट्रू वर्शिप संस्थेच्या विश्वस्त अनिता तसेच श्री साई ट्रस्टच्या संचालिका राधिका घुले यांच्या सहकार्याने आणि तालुक्यातील बेकरे केंद्राचे केंद्रप्रमुख दिलीप घुले यांचे सहकार्य राहिले. या कार्यक्रमांना मुख्याध्यापिका चौधरी, शिक्षक जोगदंड, तांबे, मंगेश वैखरे, महेश वैखरे तसेच मुख्याध्यापिका करंदीकर, शिक्षक मोडक, झांजे, व्यवस्थापन समिती अध्यक्ष कदम आदी उपस्थित होते.

# पांडुरंग हातनोलकर यांचे निधन

**। वावोशी । वार्ताहर ।**



वावोशी गावातील संत विचारांचे अनुयायी पांडुरंग काशिनाथ हातनोलकर यांचे निधन झाले आहे. निधनासमयी ते ९० वर्षांचे होते. संत तुकाराम महाराजांचे अभंग त्यांचे तोंडपाठ होते. त्यांच्याशी कोणत्याही विषयावर चर्चा करताना ते संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील चरणाचा दाखला देऊन ते त्या विषयाचे स्पष्टीकरण देत असत. त्याचप्रमाणे त्यांना शिल्पकला देखील अवगत होती. त्यांनी वावोशी गावातील शंकर मंदिरातील पिंड व नंदी बैलाचे शिल्प साकारले आहे. त्यांच्या पश्चात एक भाऊ, मुलगा, सून आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि.१) साजगाव येथील श्री क्षेत्र धाकटी पंढरी येथे होणार आहे. तर, उत्तरकार्य शुक्रवारी (दि.४) वावोशी येथील त्यांच्या राहत्या घरी होणार आहे. यावेळी सकाळी साडेदहा वाजता काशिनाथ वाघुले महाराज यांचे प्रवचन देखील होणार असल्याचे हातनोलकर कुटूंबियांकडून सांगण्यात आले आहे.

# सताणे यांची अध्यक्षपदी नियुक्ती

**। पेण । प्रतिनिधी ।**

रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया १९५६ या पक्षाच्या पेण तालुका अध्यक्षपदी लक्ष्मण सताणे यांची निवड करण्यात आली आहे. रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजरत्न आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली यापुढे काम करण्याचा संकल्प लक्ष्मण सताणे यांनी केला असून पक्षाचे कोकण प्रदेश अध्यक्ष जगदीश गायकवाड, कार्याध्यक्ष एम.डी. कांबळे व जिल्हाध्यक्ष अशोक गोतरणे यांच्या मार्गदर्शनाखाली



त्यांची पेण तालुक्याच्या अध्यक्षपदी सर्वांच्या अनुमते नियुक्ती करण्यात आली. यावेळी पक्षाच्या पेण तालुका उपाध्यक्षपदी भगवान लाटे, सरचिटणीसपदी मिलिंद कांबळे, कोषाध्यक्षपदी सुभाष कांबळे, सह कोषाध्यक्षपदी दिगंबर सताणे, संघटकपदी राजेंद्र कांबळे, रविंद्र गायकवाड, विलास पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# गणेश दिघेंचा सन्मान

**। कोलाड । वार्ताहर ।**

महाराष्ट्राने घेतलेल्या अनेक महत्त्वाच्या निर्णयाची माहिती उद्योग जगत साकारणाऱ्या उद्योजकांना, व्यवसायिकांना व्हावी या उद्देशाने पनवेल तालुक्यातील उलवे येथे 'महाराष्ट्राची उद्योग भरारी' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी रोहा तालुक्यातील गोवे येथील उद्योजक गणेश दिघे यांना या कार्यक्रमात महाराष्ट्र शासनाच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी विद्यमान खासदार, आमदार तसेच पी. वेलरासू, दीपेंद्रसिंह कुशवाह, प्रदीप चंद्रन, सुनील थोरवे, विजू सिरसाठ, गुरुशांत हरळय्या आदी उपस्थित होते.

# सेवानिवृत्त संघटनेची वार्षिक सभा

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा सेवानिवृत्तांच्या संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा नढाळ-चौक येथील श्री क्षेत्र पंचायतन मंदिरात दि.२९ सप्टेंबर रोजी संपन्न झाली. या सभेसाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेसाठी संस्थेचे राज्य सरचिटणीस लक्ष्मण टेंभे, रायगड जिल्हाध्यक्ष धुरंधर ढवी, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, संस्थेचे पदाधिकारी वावेकर व



अन्य पदाधिकारी उपस्थित होते. सभेच्या कामकाजात नियमित कामकाजाव्यतिरिक्त लक्ष्मण टेंबे, मढवी यांनी संघटना शक्ती व यश या संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी प्रितम म्हात्रे यांनी मार्गदर्शन करतांना श्रीक्षेत्र पंचायतन मंदिराच्या लोकोपयोगी उपक्रमांबद्दल मोलाची माहिती सांगितली.

# उरण येथे टॅक्सी संघटनेची सभा संपन्न

**। उरण । प्रतिनिधी ।**



उरण-जुईनगर-पनवेल टॅक्सी चालक मालक संघटनेची सर्वसाधारण सभा रविवारी (दि.२८) उरणमध्ये पार पडली. या सभेला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद पवार गट) महाराष्ट्र प्रदेश महिला सरचिटणीस व जेष्ठ सल्लागार भावना घाणेकर तसेच उरण वाहतूक शाखेचे उपनिरीक्षक संजय पवार उपस्थित होते. यावेळी संजय पवार यांनी वाहतूकीचे नियम व शिस्त याबद्दल सर्वांना चांगल्या प्रकारे मागदर्शन केले. भावना घाणेकर यांनी सांगीतले की, आपल्या संघटनेसाठी लागेल ती सर्वतोपरी मदत करेन व सर्वांना सहकार्य करेन. या सभेचे आयोजन संघटनेचे उपाध्यक्ष मंगेश कांबळे यांनी केले. यावेळी संघटनेचे सर्व सभासद उपस्थित होते.

# नेत्र तपासणी शिबीर उत्साहात

**। उरण । प्रतिनिधी ।**

संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशनच्यावतीने रविवार दि.२९ सप्टेंबर रोजी नवीन शेवा येथे मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सुमारे २३० निरंकारी भक्त आणि ग्रामस्थांनी सहभाग घेतला होता. संत निरंकारी मंडळाचे दत्ताराम पाटील व प्रेमा ओबेरॉय यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अशोक केरेकर तसेच सर्व शाखा प्रमुख, सेवादल, संचालक व अधिकारी उपस्थित होते.




## नॅशनल स्किल कॉलिफिकेशन् फ्रेमवर्कचा उपक्रम

# आंबा कलम कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना धडे

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

**भारत हा कृषिप्रधान देश आहे. पर्यावरण रक्षण काळाची गरज आहे. येणाऱ्या काळात शेतीचे महत्त्व लक्षात घेता विद्यार्थ्यांना बागकाम व शेतीकाम येणे गरजेचे आहे. यादृष्टीने कलम करण्याचे कौशल्य शिकल्यास ते स्वतः रोपवाटिका तयार करू शकतात. नॅशनल स्किल कॉलिफिकेशन् फ्रेमवर्क या उपक्रमांतर्गत राजिप शाळा सिद्धेश्वर येथे जनार्दन भिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचे गट पाडून आंबा कलम कार्यशाळा घेण्यात आली.**



यावेळी जनार्दन भिलारे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, हा पर्यावरण स्नेही उपक्रम विद्यार्थांना खूप आवडला. नॅशनल स्किल कॉलिफिकेशन् फ्रेमवर्क अंतर्गत हा उपक्रम शाळेत आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सर्व विद्यार्थांना माळी काम शिकविले जाते. यात मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक विद्यार्थ्यांना उस्फुर्तपणे माळी काम हा विषय शिकवतात. यामुळे मुलांना पर्यावरणाची आवड निर्माण झाली आहे. शाळेतील काही विद्यार्थी स्वतः कलम तयार करतात. याबाबतचे व्हिडिओ यू ट्यूबवर टाकले असून ते पाहून आपणही कलम करू शकता, असेही भिलारे यांनी सांगितले आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका रोहिणी खामकर तसेच शिक्षका स्वप्नाली मेमाणे, प्रिया काळे यांनी खूप मेहनत घेतली होती. या उपक्रमाचे शिक्षणाधिकारी रायगड पुनिता गुरव, जिल्हा कार्यकारी रत्नशेखर गजभिये, गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, केंद्रप्रमुख कैलास म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रविंद्र यादव, उपाध्यक्षा तेजस्विनी गायकवाड व सर्व सदस्य तसेच सर्व स्तरावर कौतुक होत आहे.

### आंबा कलम कृती

**आंबा कलम करण्यासाठी एक गावठी आंबा झाड व कलम पट्टी, कलम काडी, ब्लेड, प्लास्टिक बॅग हे साहित्य लागते. प्रथम गावठी झाडाचा शेंडा कट करून घ्यावा. यानंतर कलम काडीला २ इंच आकार देऊन गावठी आंब्यावर २ इंच छेद करा. आकार दिलेली कलम काडी गावठी आंब्यावर घट्ट बसविल्यानंतर कलम पट्टीच्या साह्याने घट्ट बांधा. तयार झालेल्या आंबा कलमावरून लहान प्लॅस्टिक बॅग टाकून खाली धागा बांधा.**

# 'एक पेड माँ के नाम'




**। उरण । प्रतिनिधी ।**

ओएनजीसी उरण संयंत्रने अलिबागचा वन विभाग आणि एनजीओ शृंखला यांच्या संयुक्त विद्यमाने २८ सप्टेंबर रोजी भारत सरकारच्या 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाचा एक भाग म्हणून कोळघर येथे १० विविध देशी जातींचे सुमारे १० हजार सीडबॉल टाकण्यात आले होते. ओएनजीसी टीमचे नेतृत्व हेड मेंटेनन्स आणि ऑफिशिएटिंग प्लांट मॅनेजर विक्रम सिंग, मुख्य अभियांत्रिकी सेवा वायव्हीटीआर शेखर, जीएम हेड एचआर भावना आठवले आदींनी केले. यावेळी स्थानिक आदिवासी महिलांनी स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने सीडबॉल तयार केले होते. ज्यामुळे त्यांना उदरनिर्वाहही झाला. जवळच्या आश्रमशाळेतील सुमारे ४०० हुन अधिक मुलांनी यात सहभाग घेतला होता.

**निवडक**

## कारच्या धडकेने रिक्षा पलटी

**पनवेल :** अनोळखी कारने रिक्षाला धडक दिल्याने रिक्षा पलटी झाली आणि यात रिक्षा चालक जखमी झाला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. किसन भालेकर हे रिक्षा घेऊन नवीन पनवेल येथे जात होते. ब्रिजकडे जाताना रस्त्याच्या अगोदरच्या सिग्नलला थांबले. यावेळी अनोळखी कारवरील चालकाने रिक्षाला धडक दिली. या अपघातात रिक्षा पलटी झाली. यावेळी सिग्नलवरील पोलिसांनी मदत करून त्यांना पुरोहित हॉस्पिटल येथे दाखल केले.

## 'राणेंविरुद्ध गुन्हा दाखल करा'

**पनवेल :** हिंदू-मुस्लिम समाजांमध्ये तेढ निर्माण करणाऱ्या आ.नितेश राणेंविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी हाजी शाहनवाज खान यांनी एनआरआय पोलीस ठाण्यामध्ये निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, आ. नितेश राणे हिंदू मुस्लिम बांधवांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. गणेशोत्सव काळात देखील नितेश राणे यांनी मुस्लिमांना वाळीत टाकण्याची भाषा केली आहे. त्यामुळे आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये आ. नितेश राणे यांच्या येण्यावर बंदी घालावी, अशी मागणी केली आहे.

## महिलेच्या बांगड्यांची चोरी

**पनवेल :** बसमध्ये चढत असताना दोन तोळे वजनाच्या सोन्याच्या बांगड्या चोरल्याची घटना पनवेल शहरात घडली. निर्मला पाटील या गणेशोत्सव झाल्यानंतर ते कांदिवली येथे जाण्यासाठी निघाले. पनवेल बस स्टँड येथे सांडोशी बोरिवली अशी बस लागली. बसमध्ये गर्दी झाली होती. गर्दीमध्ये निर्मला आणि त्यांचे पती चढत असताना त्यांना कटकट असा आवाज आला. त्यांनी बसमध्ये चढल्यानंतर गळ्यातील सोने पाहिले तर ते सुरक्षित होते. मात्र हातातील सोन्याच्या बांगड्या दिसून आल्या नाहीत.

## हजारोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** बंगल्याच्या मुख्य दरवाजाची कडी कोयंडा उचकटून चोरट्याने घरात प्रवेश केला आणि २५ हजार रुपये चोरून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनायक गणेश जोशी हे लोअर परेल, मुंबई येथे राहतात. त्यांचा गणेश कुंज नावाचा बंगला देवद येथे आहे. त्यांनी २५ हजार रुपये बेडरूमच्या लोखंडी कपाटाच्या ड्रॉवरमध्ये ठेवले होते. चोरट्याने बंगल्यात प्रवेश केला आणि २५ हजार रुपये चोरून गेले.

## तालुकाध्यक्षपदी सचिन कांबळे

**पनवेल :** स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या पनवेल महानगरपालिका अध्यक्षपदी निलेश कांबळे तर पनवेल तालुकाध्यक्षपदी सचिन कांबळे यांची नियुक्ती जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी त्यांना नियुक्तीपत्र देत जाहीर केली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष सागर संसारे व महाराष्ट्राचे युवा अध्यक्ष अनिकेत संसारे यांच्या आदेशानुसार नियुक्ती एक वर्षासाठी करण्यात आली आहे. त्यांनी आपल्या पदाचा समाजासाठी, राजकीय तसेच सामाजिक वाटचालीसाठी करावा अशा शुभेच्छा त्यांना दिल्या आहेत.

# माणगाव दिघी महामार्ग ठरतोय वरदान

## पाच वर्षांत एकही खड्डा नाही; २४६ कोटी रुपये खर्च, सर्वसामान्यांना मोठा दिलासा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

**कोकणातील रखडलेला, खड्डेमय झालेला, अर्धवट असलेला, अद्यापही कामं सुरू असलेला, रस्त्याची चाळण झालेला, आंदोलने सुरू असलेला, प्रवाशांच्या गैरसोयीचा असलेला, पर्यटकांची हाडे खिळखिळी करून टाकत असलेला, प्रवाशांची ओरड आणि बोंबाबोंब सुरू असलेला, अपघातांचे कारण ठरलेला, शेकडो जणांचे नाहक बळी घेणारा आणि कायमस्वरूपी अपंगत्व आणणारा मुंबई ते गोवा महामार्ग पाहिला तर हा महामार्ग मृत्यूचा सापळा बनल्याचे चित्र दिसत आहे. याला अपवाद ठरलाय तो माणगाव शहरातून जाणारा माणगाव ते दिघी महामार्ग.**

या रस्त्याचे संपूर्णपणे मजबूत काँक्रिटीकरण आधुनिक पद्धतीने करण्यात आले आहे. या रस्त्याचे काम जे.एम. म्हात्रे प्रा.लि.कंपनी या पनवेल येथील अनुभवी ठेकेदाराने घेतले होते. त्यांनी ते प्रामाणिकपणे वेळेत पूर्ण केले.

या महामार्गाची थेट २०१७ साली सुरवात करण्यात आली. हा महामार्ग पूर्णपणे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बांधण्यात आला आहे. या रस्त्याचा पाया सहा फूट खोल खणण्यात येऊन डबर, मोठी खडी, लहान खडी, वाळू, ग्रीट, उच्च दर्जाचे सिमेंट वापरले गेले आहे. हे करताना वारंवार रोलरचा वापर करून दाब देऊन पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला.

हा मार्ग मुळ जमिनीपासून चार फूट उंच करण्यात आल्याने महापुरात या मार्गावर पुराचे पाणी शिरले नाही. यापूर्वी या मार्गावर दरवर्षी पुराचे पाणी तुंबून मोर्बा पूल बंद करण्यात येत असल्याने शेकडो गावांचा काही




दिवस संपर्क तुटत होता. आता एकदाही मोरबा पुलावरून पाणी गेले नाही हे विशेष ठरले.

या मार्गावरील मोरबा, साई आणि म्हसळा तालुक्यातील घोणसे घाटात अत्यंत तीव्र उतार आणि चढणी होत्या. त्यांचे सपाटीकरण करून हा घाट वाहतूक आणि दळणवळणास सोपा तसेच सुलभ करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. शेकडो छोटे मोठे पूल, साकव आणि मोऱ्या बांधण्यात आल्या. एकाच वेळी माणगाव,मोरबा, साई, म्हसळा आणि दिघी या ठिकाणी बांधकामे सुरू करण्यात आली. त्यामुळे हा महामार्ग वेळेत पूर्ण होण्यासाठी मदत झाली. प्रत्येक गावाच्या ठिकाणी निवारा शेड उभारण्यात आल्या. त्यामुळे स्थानिक पातळीवर समाधान व्यक्त केले. या महामार्गाच्या दुपदरीकरणासाठी एकूण २४६ कोटींची तरतूद करण्यात आली होती.

हा महामार्ग पूर्ण झाल्यानंतर दुतर्फा सुमारे एक लाख झाडे वनखात्याच्या वतीने लावण्यात आली आहेत. त्यामुळे येत्या काही वर्षांत हा महामार्ग हिरवाईने नटलेला दिसणार आहे. तसेच अपघातांना आळा घालण्यासाठी गतीरोधक, रिफ्लेक्टर, ठिकठिकाणी मार्ग फलक, रात्री चमकणारे पांढरे पट्टे तयार करण्यात आले आहेत. या महामार्गासाठी १९६५ सालातच शेतकऱ्यांना जमीन मोबदला देऊन बहुतेक जमीनी संपादीत करण्यात आल्या होत्या. त्यामुळे रस्ता बांधकाम करणे सुलभ आणि सोपे झाले. या महामार्गासोबतच इंदापूर ते दिघी हा महामार्ग तयार करण्यात आला आहे. आता दिघी येथे आंतरराष्ट्रीय बंदराला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, रोहा आणि मुरुड हे तालुके विकासाच्या नव्या महामार्गावर येऊन मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार आहे. भविष्यात दिघी ते माणगाव रेल्वे मार्ग आणि चौपदरीकरणाचे काम लवकरच सुरू होणार आहे. या सर्व भूभागाचा विकासात्मक कायापालट होणार आहे हे जाणून कौशल्य विकास आधारीत कार्यक्रम हाती घेण्यात येत आहेत. जेणेकरून स्थानिक पातळीवर रोजगाराचे साधन उपलब्ध होणार आहे.



# चौक येथे वृक्षारोपण उपक्रम संपन्न

**। रसायनी । वार्ताहर ।**

चौक रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कुल, वावर्ले या शाळेच्या परिसरात औद्योगिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या बिर्ला कार्बन इंडिया प्रा.लि. कंपनीच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत तब्बल अडीचशे वृक्षांचे वृक्षारोपण बिर्ला कंपनीच्या पदाधिकाऱ्यांमार्फत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी लेझीम पथकाच्या गजरात तसेच पुष्पवृष्टी करत सर्व पाहुण्यांचे औक्षण करून स्वागत केले. शाळेचे मुख्याध्यापक प्रक्षाळे यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या जडणघडणीचा आढावा घेत कंपनीमार्फत राबवत असलेल्या या उपक्रमाचे स्वागत केले.

यावेळी बिर्ला कार्बन इंडियाचे युनिट हेड रवींद्र रघुवंशी,एच. आर. हेड निखिल भामरे, नदार इलांगो, उर्वीश आचार्य, प्रशांत विचारे, अभिनव सक्सेना, रोहित खैरनार, हरीश रावत, सचिन कंदले या सर्वांचाच महत्त्वपूर्ण प्रत्यक्ष सहभाग होता. पाहुण्यांच्या वतीने नदार इलांगो, उर्वीश आचार्य, युनिट हेड रवींद्र रघुवंशी, उमेश कदम आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बिर्ला कार्बन इंडिया कंपनीच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. विद्यालयाच्या स्कुल कमिटी चेअरमन सुवर्णा मोरे, अरुण पारठे, लक्ष्मण मोरे, प्रशांत गायकवाड अनिल बडेकर, योगेश दरेकर, शसोपान अडसरे, एस. यु.पवार आदी शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

# नांदगाव हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

व्यवसाय मार्गदर्शन ही काळाची गरज आहे हे लक्षात घेऊन रावेत- पुणे येथील करियर नेक्स्ट संस्थेच्या वतीने नांदगाव हायस्कूलमधील विद्यार्थ्यांसाठी नुकतेच व्यवसाय मार्गदर्शन करण्यात आले.

संस्थेच्या प्रमुख सोनल खेडेकर आरेकर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना एक पत्रक देऊन त्यावरील क्यूआर कोडवरुन विद्यार्थ्यांना १०६ विविध व्यवसायांची माहिती वाचून पुढील व्यवसाय निवडता येईल असे स्पष्ट केले. इयत्ता दहावी बारावीच्या परीक्षेनंतर पुढील व्यवसायाच्या प्रवेशाबाबत विद्यार्थी व त्यांचे पालक गोंधळून जातात.दिशाहीन झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्यातील क्षमता, कल व आपल्या व्यक्तीमत्त्वावरुन आपले उद्दिष्ट ठरवले पाहिजे व ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन त्यांनी विद्यार्थ्यांपुढे केले. उसरोली येथील पंचक्रोशी आगरी समाजाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला मुरुड पंचायत समितीच्या माजी सभापती स्मिता खेडेकर, मुख्याध्यापिका ए. यू. खोत, वाय. आर.पाटील, आर.बी ढोले ,महेश वाडकर आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

## तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** मित्रांसह वाढदिवसाचा केक कापून फॉर्च्युनर कारमधून घराच्या दिशेने निघालेल्या तरुणाची कार पलटी झाल्याने अपघातात तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना उलवे येथे घडली. अनिकेत पवार असे या तरुणाचे नाव असून या अपघातात त्याचे ६ मित्र किरकोळ जखमी झाले आहेत. अनिकेतच्या मित्रांनी त्याचा वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले होते. त्यासाठी अनिकेत आणि त्याचे ६ मित्र कारने न्हावा गावात गेले होते. केक कापल्यानंतर जेवण करुन उलवेच्या दिशेने कारने येत असताना कारला अपघात झाला. अनिकेतच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याला अपोलो हॉस्पीटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले होते.



मुरूड जंजिरा समुद्रकिनारी ताजी मासळी विकत घेण्यासाठी पर्यटक किनाऱ्यावर मासेमारी करून येणाऱ्या बोटीची वाट पाहत आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## दिव्यांग कार्यालय तळमजल्यावर सुरू करा

**पनवेल :** तहसील कार्यालयातील दिव्यांगाचे कार्यालय तळमजल्यावर सुरू करण्याची मागणी भरत जाधव यांनी पनवेलचे प्रांताधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. येथील दिव्यांग बांधव, ज्येष्ठ नागरिक तसेच ज्येष्ठ महिला हे शहरासह तालुक्यासह शहरातून तहसील कार्यालयात कामकाजासाठी येत असतात. एखादा व्यक्ती घसरुन खाली पडण्याची शक्यता आहे. दिव्यांग बांधवांचा विचार करून कार्यालय तळमजल्यावर सुरू करण्याची मागणी केली आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- अलिबाग-पिंपळभाट स्वामी समर्थ मठासमोर श्री प्रकाश अपार्टमेंट मधील २ BHK फ्लॅटस् विकणे आहेत. (प्रत्येक फ्लोअरवर फक्त २ फ्लॅट) संपर्क : ९४२२६९६१३३/९९२३१८४७०१
- नांदगाव-मुरूड येथील कॉटेज श्री समर्थ रिसॉर्ट भाडेतत्त्वावर चालविण्यास देणे आहे. संपर्क - ९७६९४७४०६३
- अलिबागमधील नामांकित मोटार ट्रेनिंग स्कुलसाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क : ९८२३४९२६२६/७९९८६१९९९१
- इंटरनॅशनल फास्ट फूड कॅफे मध्ये कामासाठी मुले व मुली पाहिजेत ( अनुभवाची गरज नाही) Five star chicken अलिबाग कामाची वेळ : दुपारी १ ते रात्री ११ (पगार ९०००/-) पार्ट टाइम जॉब : संध्याकाळी ५ ते रात्री ११ ( पगार ६०००/-) संपर्क : call ९६१९३८३२२३/ Whatsapp ८९२८७५५८९५
- IRCED मायक्रो फायनान्स कंपनीसाठी वावे, पेण, रोहा येथे महिला कर्ज अधिकारी नेमणे आहे. विवाहित महिलांना प्राधान्य. दुचाकी आवश्यक. संपर्क ८३२९५५११९१/८६०५२०४२१६
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलच्या कामासाठी मावशीची (आया) आवश्यकता आहे. संपर्क- ९८२२४०९८४९, ९८५०३४८५०६.
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रिसेप्शन (पेमेंट-९०००-१३००० अनुभवानुसार) किमान १-२ वर्षे अनुभव आवश्यक. २. काँटिनेंटल कुक (पेमेंट-२२००० आणि वर अनुभवानुसार) किमान-५ वर्षे अनुभव आवश्यक. अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळात संपर्क साधावा आणि व्हॉट्सॲपवर रेझ्युमे शेअर करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# उलवेच्या महाराणीचे जल्लोषात आगमन

**। पनवेल । वार्ताहर ।**

उलवेमध्ये सामाजिक क्षेत्रात आघाडीवर असलेले आणि सातत्याने ६ वर्षे उलवेकरांसाठी विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवणारे शिवसंघर्ष प्रतिष्ठानमार्फत यंदा देखील भव्यदिव्य स्वरूपात नवरात्र उत्सव साजरा होत आहे. शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडत असून 'नवसाला पावणारी उलवेच्या महाराणीचा नेत्रदीपक आगमन सोहळा अतिशय उत्साहात आणि भक्तिपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

उलवे सेक्टर २०, रेडक्लिफ शाळेजवळच्या भव्य मैदानात फटाक्यांच्या आतिषबाजीत देवीचे आगमन झाले. मात्र त्यापूर्वी उलवेच्या महाराणीची भव्य रॅली काढण्यात आली होती. यावेळी शिवसंघर्ष प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अखिल यादव यांच्यासह पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते शेकापचे प्रीतम म्हात्रे यांच्यासह प्रतिष्ठानच्या महिला सदस्या, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि असंख्य उलवेकरांनी या सोहळ्याला हजेरी लावली होती.

'वादळ' या प्रसिद्ध ढोल पथकाने रॅलीत उत्कृष्ट वादन करून उपस्थितांना ढोल-ताशाच्या ठेक्यावर थिरकायला भाग पाडले. महिलांनीएकसारखा पोशाख करून विशेष लक्ष वेधले तर महाराणीचा फुलांची सजवलेला भव्य रथ विशेष आकर्षण ठरला. फटाक्यांच्या आतिषबाजीने अक्षरशः डोळे दिपवणारा नयनरम्य नजारा यावेळी उलवेकरांनी अनुभवला. चिमुकल्यांनी लाठी-काठीचे थरारक कौशल्य दाखवले तर मावळ्यांच्या वेशातील तरुणांनी तलवारबाजीसह शिवकालीन खेळांचे उत्तम प्रदर्शन केले. महिलांनी फुगडी आणि पारंपरिक नाच करत ठेका धरला होता. 'उलवेच्या महाराणी'च्या आगमन सोहळ्याला भव्य आणि ऐतिहासिक स्वरूप प्राप्त झाले होते. एकूणच उलवेकरांची प्रतिमा उंचावणारा आणि मनोरंजनाचे सर्व रेकॉर्ड तोडणारा हा सोहळा संपन्न होणार असल्याचे तयारीवरूनच दिसून येत असल्याचे कौतुकोद्गार प्रीतम म्हात्रे यांनी काढले. या नवरात्र उत्सवात ९ दिवस दांडिया, रास गरबा खेळला जाणार असून बक्षिसांची उधळण विजेत्यांवर होणार आहे. तसेच लकी ड्रॉ देखील ठेवण्यात आला



आहे. लाखो रुपयांची बक्षिसे आयोजकांकडून घोषित करण्यात आली आहेत. भाविकांनी दर्शनासाठी जरूर यावे आणि नवसाला पावणाऱ्या उलवेची महाराणीचे आशीर्वाद घ्यावेत असे आवाहन अखिल यादव यांनी केले आहे.

## तिनविरा थांब्यावर रास्तारोको करणार

**अलिबाग :** अलिबाग-वडखळ महामार्गावरील तिनविरा हा थांबा एसटी महामंडळाने १० वर्षांपूर्वी जलद थांबा मंजूर केला. या थांब्यावर जलद गाड्या थांबत नसल्यामुळे गैरसोय होते. याबाबत विभागीय नियंत्रक कार्यालयाकडे अनेक वेळा लेखी तक्रारी केल्या. ज्येष्ठ पत्रकार बळवंत वालेकर यांच्या नेतृत्वाखाली या थांब्याजवळ ७ ऑक्टोबर रोजी रास्ता रोको कार्यक्रम आयोजिला आहे, असे ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष दामोदर ठाकूर यांनी सांगितले.

**रक्तदानासाठी पुढाकार घेण्याचे तरूणाईला आवाहन**


# रक्तदानाच्या महान कार्याचा उत्सव

**एकविसाव्या शतकात मानवाने आजपर्यंत विज्ञान, आरोग्य, चंद्रयान अभिमान, शेती तंत्रज्ञान,औद्योगिक, आधुनिक तंत्रज्ञान आदी क्षेत्रात भरपूर प्रगती केली आहे. मात्र मानवी रक्ताला दुसरा पर्याय शोधण्यात आजपर्यंत मानवाला अथवा विज्ञानाला यश मिळाले नाही. यासाठी माणसाचा जीव वाचविण्यासाठी माणसाचेच रक्त लागते. यासाठी रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे.**

रक्तदान जनजागृतीपर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद,राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था, महाराष्ट्र शासन, राज्य रक्त संक्रमण परिषद, म.रा.ए.नि.सं. तसेच वेगवेगळ्या सामाजिक संस्था,औद्योगिक क्षेत्र, महाविद्यालय आदींच्या माध्यमातून ऐच्छिक रक्तदान मोहीम जनजागृतीपर यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे.

ऐच्छिक रक्तदान मोहिमेला यावर्षी २० वर्षे होत असून यासाठी सर्वात मोठे योगदान स्वैच्छिक रक्तदात्यांचे आहे. त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस साजरा होत आहे. राष्ट्रीय ऐच्छिक रक्तदान दिवस सर्व प्रथम ०१ ऑक्टोबर १९७५ या दिवशी इंडियन सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्यूजन अँण्ड इम्यूनो हिमँटोलाँजी या संस्थेच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

इंडियन सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्यूजन अँण्ड इम्यूनो हिमँटोलाँजी या संस्थेची स्थापना २२ ऑक्टोबर १९७१ या दिवशी



के.स्वरुप क्रिशेन आणि डॉ.जे.जी. ज्वाली यांनी केली.

जागतिक आरोग्य संघटना, रेडक्रास आणि रेड क्रेसेंट सोसायटीच, इंटरनँशनल फेडरेशन आँफ ब्लड डोनर आँर्गनायझेशन आणि इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ब्लड ट्रान्सफ्यूजन यांनी सुरक्षित रक्त आणि रक्त उत्पादकांच्या गरजेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि स्वैच्छिक रक्तदान करून रक्तदान महायज्ञात रुग्णांचे प्राण वाचविणाऱ्या ऐच्छिक रक्तदाता म्हणून या मोहिमेत सामील झालेल्या रक्तदात्यांचे आभार मानले पाहिजे.

हा कार्यक्रम प्रथमच २००४ मध्ये चार प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्थाव्दारे आयोजित करण्यात आला होता. याला यावर्षी २० वर्षे पूर्ण होत आहे.

समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून निःस्वार्थीपणे, समाजहितासाठी, राष्ट्रसेवा म्हणून रक्तदान महत्त्वाचे. ऐच्छिक रक्तदाता म्हणून व्हॉट्सअप ग्रुप, सोशल मीडिया, डिजिटल माध्यमातून रक्तदान शिबीर तसेच रक्तदाता नोंदणी संपर्क अभियान राबवून रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी मदत होऊ शकते. रक्तदान अभियान राबविण्यात येणाऱ्या आरोग्य सेतू पोर्टल https://eraktkosh.mohfw.gov.in/ या वेबसाईटवर रजिस्टर नोंदणी करून ऐच्छिक रक्तदान करुन रक्तदानाबद्दल ऑनलाईन रक्तदान प्रमाण पत्र देता येते.

अनेक सेवाभावी संस्था, सामाजिक संस्था आणि सामान्य माणसांनीही रक्तदानासाठी मोठ्या प्रमाणावर पुढे यायला हवे. त्यामुळेच देशात आवश्यक तेवढा रक्तसाठा उपलब्ध होईल.

रक्तदान हे महान कार्य आहे तसेच मानवी रक्ताची गरज कधीही न संपणारी असल्यामुळे रक्तदानाविषयी प्रेरणा समाजात दृढ करणे, निरोगी रक्तदात्यांची फौज उभी करून रक्तदात्यांमध्ये ऐच्छिक रक्तदानाविषयी जनजागृती करणे, सामाजिक बांधिलकी जोपासून रक्तदात्यांविषयी कृतज्ञता निर्माण व्हावी, या मागचा एवढाच उद्देश.

**- हेमकांत सोनार**
रक्तपेढी तंत्रज्ञ,जिल्हा रुग्णालय
९५११८८२५७८.

# छुप्या पद्धतीने डिझेल विक्री तेजीत



। पनवेल । प्रतिनिधी ।

इंधनाचे दिवसेंदिवस भाव वाढत असल्याने अनेक वाहनचालक पर्यायी इंधनाचा वापर करत आहेत. खालापूर तालुक्यातील भोलेनाथ ढाब्यासह रुचिरा बियर शॉपीजवळदेखील अशा पर्यायी आणि स्वस्त इंधनाची विक्री बेकायदेशीरपणे होत आहे, अशी चर्चा आहे. खालापूर तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाकडून कोणत्याही कारवाईचा बडगा उचलला जात नसल्यामुळे बेकायदेशीर डिझेल विक्री करणाऱ्यांचे चांगलेच फावले आहे. यामध्ये पोलीस प्रशासन असो किंवा मग तहसील विभागाचे पुरवठा अधिकारी कारवाई करण्यासाठी मागे का, असा सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.


सामान्य डिझेलच्या किमतीत आणि बायो डिझेलच्या किमतीतील तफावत अशा पद्धतीने व्यवसाय तेजीत आणत आहेत. डिझेल पंप चालकांना त्यामागे कर स्वरूपात शासनाला महसूल द्यावा लागतो, मात्र बायो डिझेल विक्री करणारे मोकाट रस्त्यांवर या डिझेलची विक्री करीत आहेत. राज्यात बायो डिझेल विक्रीवर प्रतिबंध असतानाही अनेक ठिकाणी बायो डिझेलची विक्री जोर धरत आहे. अशातच गेली अनेक वर्षे खालापूर तालुक्यात या डिझेलच्या विक्रीने उच्छाद मांडला आहे. चौक फाटा ते खालापूर या रस्त्यावर भोलेनाथ धाब्यासह रुचिरा बियर शॉपीजवळच्या मागील बाजूस लाखो लीटर बायो डिझेलची दिवसभर साठवणूक करून रात्रीच्या अंधारात विक्री करण्याचा प्रकार सुरू आहे. तसेच काही ठिकाणी टँकरमधून ऑईल चोरीदेखील केली जात आहे. याठिकाणी पोलिसांची गस्त असते, मात्र रात्रीच्या सुमारास मोठमोठे कंटेनर या धाब्याच्या मागे का जात असावे किंवा मग टँकर या बियर शॉपीच्या मागे का जात असावे? हे त्यांना दिसत नसावे का? तसेच तहसील कार्यालयाच्या पुरवठा अधिकाऱ्यांचे त्यांच्या परिसरात लक्ष नाही का, असे अनेक प्रश्न यानिमित्ताने समोर येत आहेत.

## भोलेनाथ धाब्यासह रुचिरा बियर शॉपीजवळ विक्री?

## श्रीवर्धनमध्ये बिबट्याची दहशत

। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।

श्रीवर्धन तालुक्यासह विविध भागांत गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्या दिसण्याच्या घटना घडत आहेत. पुन्हा एकदा वाहन चालक प्रसन्न विचारे यांना श्रीवर्धन-दांडगुरी-बोर्ली प्रवास करत असताना हुणेरवेलीच्या उतारात बिबट्या रस्ता ओलांडून जात असताना दिसला. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या सर्व गोष्टींकडे वनविभाग गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे. शिकारीच्या शोधात तालुक्यातील विविध ठिकाणी बिबट्या फिरत असण्याच्या घटना वेळोवेळी घडत आहेत. वेळास आगार, सर्वे, वांजळे, खुजारे, बोर्ली-पंचतन, वावे-पंचतन, दांडगुरी, हुणेरवेली अशा भागात अनेकदा गेल्या काही दिवसांमध्ये बिबट्या बघीतल्याच्या घटना घडल्या आहेत, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



सद्यःस्थितीत जंगलामध्ये शिकार मिळत नसल्याने बिबट्याने आपला मोर्चा लोकवस्तीमध्ये वळविला आहे. घराबाहेर बांधलेले श्वान, गोठ्यात बांधलेल्या गायी, म्हशी यांच्यावर भरवस्तीत घुसून भरदिवसा हल्ला केल्याच्या घटना घडत असतानादेखील याचे वनविभागाला कोणत्याही प्रकारचे सोयरसुतक नसल्याचे निदर्शनास येत आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

### महाराष्ट्र शासन
### महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email :-mahad.ee@mahapwd.gov.inPh.No (०२१४५) २२२१६७

**निविदा सूचना क्रमांक ५० सन २०२४ २०२५**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्यता वर्गातील नोंदणी कृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या : https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु क्र मांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मौजे महाड ता महाड जि रायगड येथे तालुकास्तरीय मध्यवती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे<br>Civil 197644040/-<br>Electrical 21480277/-<br>Total Part A 219124331/-<br>Part B 2628842/-<br>**Total 221753179/-** | २२,१७,५३,१७९/- | ११,०९,०००/- | ३५४०/- | २४ महिने | आवश्यकता नाही |
| २ | मौजे महाड ता महाड जि रायगड येथे बांधकाम भवन इमारतीचे बांधकाम करणे | ३,०४,९४,१५८/- | १,५३,०००/ | २३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| ३ | राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत मौजे टोळ बुद्रुक ता महाड येथील टोळ तलावाचे संवर्धन करणे ता महाड जि रायगड | २७९२३०३०/- | १५००००/- | २३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| ४ | अडावळे ते चिखली रस्ता ग्रा मा ४७ वर पुलाचे बांधकाम करणे ता पोलादुपर जि रायगड | २,०७,१४,५१९/- | १,५०,०००/- | २३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| ५ | मौजे अंबरले ता माणगाव जि रायगड येथे पायाभुत सुविधा निर्माण करणे | १,५१,७७,७१९/- | १,५०,०००/- | ११८०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २७.०९.२०२४ ( सकाळी १०.०० पासून) ते दिनांक ०४.१०.२०२४ वेळ १८.०० वाजेपर्यत |
| २ | निविदापूर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग कोंकण, मर्झबान रोड, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ३०.०९.२०२४ वेळ १२.०० वाजता. अ. क्र. १ ते ३ करीता<br>मा. अधीक्षक अभियंता, रायगड ( सा.बां) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ३०.०९.२०२४ वेळ ०३.०० वाजता. अ.क्र ४ ते ५ करीता |
| ३ | ऑनलाईन व्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, कोकणभवन, नवीमुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०७.१०.२०२४ वेळ १२.०० वाजता |

टिप:- परिपुर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादरकरता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४५३५
दिनांक : २५.०९.२०२४

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा. बां.) विभाग, महाड**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णन :- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

**मौजे :- जांभुळपाडा ता. उरण, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | शेतकऱ्यांचे नाव | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ३२/१२ | १.पद्माकर गजानन गोंधळी<br>२.कुसुम गोपाळ पाटील<br>३. मनोज गजानन गोंधळी<br>४. रविंद्र गजानन गोंधळी<br>५.लाडकुबाई गजानन गोंधळी<br>६. विठाबाई रमेश पाटील<br>७. जगदीश गजानन गोंधळी | ०.९२.००<br>पैकी<br>०-१८-०० | २.५१ |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कब्जेदाराच्या मालकी हक्कांत व कब्जे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबदल विद्यमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतींवर कोणाचाही, कोणताही, कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मार्टगेज, संपादन, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरुन, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- उरण
दिनांक :- ०२-१०-२०२४

**ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता :- शॉप नं. ९०५-९०८, शेल्टॉन क्युबीक्स, प्लॉट नं.-८७, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड)

ज.म.र अर्ज २९/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्री. नितीन अर्जुन शेळके
रा. ए ३०३, सिध्दांत अपार्टमेंट — अर्जदार
झेंडा बाजार, कबुतर खाना जवळ
वसई, मुंबई

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत शहापूर — सामनेवाला
ता.अलिबाग, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे धामणपाडा अलिबाग, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचा श्री. नितीन अर्जुन शेळके यांचा जन्म दि. ११/०२/१९८७ रोजी मौजे धामणपाडा, येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत शहापूर येथे केलेली नसल्याने त्यांचा जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत शहापूर यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दि.२१/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२४/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २४/०९/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

### जाहीर नोटीस

दिनांक : ०१/१०/२०२४

माझे अशिल दीपक रघुनाथ पेंडसे रा. मु. इंद्रपै, पो. सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी सांगितलेवरून दिलेल्या माहितीवरून व दाखवलेल्या कागदपत्रावरून त्यांच्या तर्फे सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते ते खालीलप्रमाणे,

माझे अशिलांकडुन त्याचे मालकीचे मौजे आवास, ता.अलिबाग जि.रायगड येथील मिळकतींबाबत-

१) रिकनव्हेंस दस्त क्र. ५०३/१९३२ दिनांक २९/०३/१९३२ मौजे आवास, ता. अलिबाग जि. रायगड, सर्व्हे नं. ४७/२ व सर्व्हे नं. ४८/१
दस्त लिहून देणार- हरी बापु जोगळेकर
दस्त लिहुन घेणार -गजानन कृष्णा पेंडसे, विश्वनाथ गजानन पेंडसे, रघुनाथ गजानन पेंडसे व नारायण गजानन पेंडसे

२) फरोक्त खत दस्त क्र. ९१३/१९३२ दिनांक ०९/०६/१९३२ मौजे आवास, ता.अलिबाग, जि.रायगड सर्व्हे नं. ४७/२, व सर्व्हे नं. ४८/१.
दस्त लिहुन देणार- गजानन कृष्णा पेंडसे
दस्त लिहुन घेणार- रामचंद्र यज्ञेश्वर अचवल

३) फरोक्त खत दस्त क्र. ४९८/१९४१ दिनांक २८/०४/१९४१ मौजे आवास, ता. अलिबाग, जि. रायगड सर्व्हे नं. ४७/२, व सर्व्हे नं. ४८/१.
दस्त लिहून देणार - रामचंद्र यज्ञेश्वर अचवल
दस्त लिहून घेणार - गजानन कृष्णा पेंडसे

वर नमुद मुळ दस्त आमचे अशिलांकडुन इंद्रपै-आवास ता.अलिबाग ते चोंढी, ता. अलिबाग प्रवासा दरम्यान दिनांक २७/०९/२०२४ रोजी गहाळ झालेले आहेत. सदर बाबत मांडवा सागरी पोलीस ठाणे, ता.अलिबाग येथे दिनांक ३०/०९/२०२४ रोजी पोलीस ठाणे गहाळ वस्तू नोंद वही क्रमांक ०१६७/२०२४ अन्वये आमचे अशिलांनी तक्रार दाखल केलेली आहे. तरी सदरचे दस्त कुणासही मिळाल्यास सदर दस्त तत्काळ माझे अशिल यांस परत करावे. जर सदर दस्तांचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केल्यास त्यास माझे अशिल जबाबदार राहणार नाहीत. व अशा व्यक्तिचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कारवाई देखील माझे अशिल करतील याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०१/१०/२०२४

सही/-
**(ॲड. संजय द.म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप. हौ.सो.,ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मार्केवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकती मालक १) फ्रेडी रुसी सुर्ती व २) परविझ रुसी सुर्ती यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ५ | १० | ०.३४.०० पैकी ०.१७.०० | ०.१२ |

सबब सदर वर नमुद केलेल्या क्षेत्राच्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ०८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेल्या क्षेत्राची मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील क्षेत्राच्या मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : - ०३/१०/२०२४

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड -४१०२०१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णन :- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

**मौजे :- बेलोंडाखार ता. उरण, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | शेतकऱ्यांचे नाव | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ९४/८ | १.नारायण तुकाराम पाटील<br>२.आत्माराम तुकाराम पाटील<br>३. मदन तुकाराम पाटील<br>४. अनंत तुकाराम पाटील<br>५. ठकाबाई मारुती पाटील<br>६. ताईबाई धनाजी ठाकूर<br>७.धर्मुबाई नारायण ठाकूर<br>८. अनुबाई हसुराम जोशी | ०.५३.५०<br>पैकी<br>०.१६.०० | ८.१९ |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कब्जेदाराच्या मालकी हक्कांत व कब्जे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबदल विद्यमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतींवर कोणाचाही, कोणताही, कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मार्टगेज, संपादन, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरुन, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- उरण
दिनांक :- ०२-१०-२०२४

**ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता :- शॉप नं. ९०५-९०८, शेल्टॉन क्युबीक्स, प्लॉट नं.-८७, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णन :- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

**मौजे :- चाणजे ता. उरण, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | शेतकऱ्यांचे नाव | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ३९/३ | १.निलंबरी घनश्याम श्रॉफ<br>२.नील घनश्याम श्रॉफ<br>३. रेखा विल्यम<br>४. चंद्रशेखर लक्ष्मीदास श्रॉफ<br>५. माधुरी दुष्यंत गांजावाला<br>६. अक्षदा दुष्यंत गांजावाला<br>७. अमिता अमरीश आजिंक्य | ०.०८.८० | ०.०० |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कब्जेदाराच्या मालकी हक्कांत व कब्जे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबदल विद्यमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतींवर कोणाचाही, कोणताही, कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मार्टगेज, संपादन, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरुन, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- उरण
दिनांक :- ०२-१०-२०२४

**ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता :- शॉप नं. ९०५-९०८, शेल्टॉन क्युबीक्स, प्लॉट नं.-८७, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, श्री.वासुदेव रामचंद्र भोईर, यांनी (property card) मिळकतीचे जमीन मालक यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड, येथील (property card) ची जमीन मिळकत**

| अ.नं | नगर भूमापण क्रमांक मालमत्ता क्रमांक | क्षेत्र चौ.मि. | धारणाधीकार |
|---|---|---|---|
| १ | ११२६ | ३५९.५० | अ |
| २ | ५८९ | २९.९० | अ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दूसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस:- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो.९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

कर्जत दि. ०२/१०/२०२४

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, श्री. हरिभाऊ वाळकू लाड, यांनी जमीन मालक श्री. योगेश श्रीराम चव्हाण, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - जांभिवली, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ६२/१/ब/२ | ०.२९.१०<br>पो.ख. ०.००.९०<br>एकूण ०.३०.०० | ३.८३ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस:- श्री साई सावली, सो.लि.दूसरा मजला, ब्लॉक नं.१०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन - ४१०२०१.

कर्जत दि. ०२/१०/२०२४ मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

### महाराष्ट्र शासन
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय शुक्रतारा बिल्डींग, तळ मजला, सत्कार प्रेस समोर, अलिबाग जि. रायगड**
**दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com**

जा.क्र.जिउनि/गृह/मोफा क्र.११/मा.अभि./जाहीर नोटीस/ /सन २०२४ २२८९ दिनांक : ३०/०९/२०२४

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये संस्था नोंदणीकरिता निर्देश मिळणेसाठी अर्ज जाहीर नोटीस**

अर्जदार श्री. हेमंतकुमार बाबाजी गुरसाळे, मुख्य प्रवर्तक नियो. दळी प्लाझा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. वेश्वी, अलिबाग, ता.अलिबाग जि. रायगड यांनी १) जागामालक व विकासक श्री.सत्यजित जी.दळी (जमिन मालक व विकासक) पत्ता-मातृछाया, बाजारपेठ ता. अलिबाग जि. रायगड यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा)अधिनियमाचे कलम १०(१) अन्वये संस्था नोंदणीचे निर्देश मिळणेकरिता अर्ज केला आहे.

अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व संबंधितांना आपले म्हणणे सादर करणेसाठी संधी मिळावी म्हणून या कार्यालयाने सुनावण्या घेतल्या आहेत, त्यामध्ये सदर अर्जाबाबत गैरअर्जदार श्री.सत्यजित जी. दळी (जमिन मालक व विकासक) यांना नोटीस मिळालेली असुनही गैरअर्जदार स्वतः किंवा प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत अद्याप पर्यंत एकाही सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. त्यामुळे त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी मिळावी म्हणून दिनांक १५/१०/२०२४ रोजी दुपारी ११.३० वाजता अंतिम सुनावणी निश्चित केली आहे. तरी संबंधितांनी निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे अन्यथा कोणाचीही काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक ३०.०९.२०२४

सही/-
**(प्रमोद जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. दिपक वासुदेव घरत, श्री. विलास किसन घरत, श्री. सुहास अनंत घरत, श्री. शाम राजाराम घरत आणि श्री. मोहन पांडुरंग पानसरे सर्व रा. सासवणे, ता.अलिबाग, जि.रायगड यांचा खालील वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये वारस हक्क आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| सासवणे जि. रायगड | ६८ | एकूण क्षेत्र ०-२७-६० | ७.३० |

वर नमूद मिळकतीवर यापुढे सोयीकरीता ''सदर मिळकत'' असे संबोधले आहे.

सदर मिळकत ही माझ्या अशिलांची वडीलोपार्जित मिळकत असून सदर मिळकतीमध्ये माझे अशिलांचा हक्क आहे. व सदर हक्क/हिस्सा त्यांनी कधीही तोंडी अथवा कोणत्याही दस्ताने कुणाच्याही लाभांत सोडलेला नाही.

माझे अशिलांना मिळालेल्या महितीप्रमोण ७/१२ वरील नमूद श्रीमती सुषमा सिताराम घरत या सदर मिळकत माझ्या अशिलांना डावलून त्रयस्थ व्यक्तीस विक्री करण्याच्या प्रयत्नांत आहेत. तेव्हा विक्रीसाठीची त्या स्वरूपाची जाहीर नोटीस ''दैनिक कृषीवल'' या वर्तमान पत्रामध्ये दिनांक २८२०५/२०२४ रोजी प्रसिध्द करून हरकती मागविल्या आहेत. तेव्हा सदर नोटीसीस व सदर मिळकत विक्रीस माझ्या अशिलांची सक्त हरकत आहे. तरी सदर मिळकतीमध्ये माझ्या अशिलांच्या असलेल्या कायदेशीर हक्कांस डावलून कोणीही कोणतीही कृती/करार करू नये. या पलिकडे श्रीमती सुषमा सिताराम घरत'' आणि इतर यांनी सदर मिळकतीबाबत कोणतीही कार्यवाही केल्यास अथवा त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण केल्यास ते माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व माझ्या अशिलांचा हिस्सा (हक्क) निर्तुटक करून मागणेकरीता दिवाणी प्रकीया संहिता १९०८ कलम ५४ अन्वये दावा दाखल करण्याची कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०१/१०/२०२४

सही/-
**ॲड. जयेश मो. पाटील**
रा. आगरसुरे पो. चोंढी,
ता.अलिबाग, जि.रायगड- ४०२२०१
मो. नं. ९६२३९२७६४३


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# क्रिकेट स्पर्धेत रायगडची बाजी

## महाराष्ट्र राज्य टेनिसबॉल स्पर्धा; ३२ जिल्ह्यांतील खेळाडूंचा सहभाग

**। नागोठणे । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य टेनिसबॉल क्रिकेट संघटना व नंदुरबार टेनिसबॉल क्रिकेट असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २३ वी महाराष्ट्र राज्य कनिष्ट गट मुले-मुली टेनिसबॉल क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन नंदुरबार येथील जी.टी. पाटील महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील ३२ जिल्ह्यांतील खेळाडू सहभागी झाले होते. चार दिवसांपासून सुरू असलेल्या अटी-तटीच्या लढतीत अंतिम सामना रायगड विरुद्ध धुळे यांच्यात खेळवला गेला. यामध्ये रायगड संघ अंतिम विजयी ठरला आहे.

रायगडचा पहिला सामना धुळे संघासोबत झाला. यावेळी रायगड संघाने १३ धावांनी धुळे जिल्ह्यावर विजय मिळवला. रायगडचा दुसरा सामना परभणी संघासोबत झाला. यावेळी रायगड ने २४ धावांनी विजय मिळविला. तिसरा सामना नंदुरबार संघासोबत झाला. यात रायगड संघाने ३ धावांनी विजय मिळविला. यानंतर अंतिम १६ मध्ये रायगडचा सामना नाशिक संघासोबत झाला. यावेळी रायगडने नाशिक संघाला ५ षटकांत २० धावांवर रोखून ते आव्हान फक्त २ षटकांत एकही गडी न गमवता पूर्ण केले. आणि अंतिम ८ मध्ये दिमाखात प्रवेश मिळवला. यावेळी रायगड व सोलापूर यांच्यात सामना झाला. रायगडने सोलापूर संघाला ५ षटकांत ५५ धावांचे आव्हान दिले होते. परंतु, सोलापूरची बारी ३१ धावांवर आटोपली. रायगडने २३ धावांनी पराभव करत आपले वर्चस्व कायम ठेवले. यावेळी रायगड संघाने सलग पाच सामने जिंकले व उपांत्य फेरीत धडक मारली. या फेरीत रायगडचा सामना ठाणे संघासोबत झाला. यावेळी ठाणे संघाने रायगडला ५ षटकांत २७ धावांचे आव्हान दिले होते. रायगड संघाने हे आव्हान फक्त २ षटकांत पूर्ण करून मोठ्या दिमाखात अंतिम सामन्यात प्रवेश केला.





या टेनिसबॉल क्रिकेट सामन्यातील अंतिम सामना रायगड व धुळे यांच्यात झाला. यावेळी धुळे संघाने रायगडला ५० धावांचे लक्ष दिले होते. लक्षाचा पाठलाग करताना रायगड संघाने उत्कृष्ट कामगिरी करत ४ षटकांत ५० धावा ठोकून विजय संपादित करून प्रथम विजेतेपद पटकावले. तर, उपविजेतेपदाला धुळे संघाला समाधान मानावे लागले असून तृतीय स्थान ठाणे संघाने मिळविले आहे. तसेच, मुलींमध्ये विजेतपद नाशिक, उपविजेतेपद नागपूर तर तृतीय स्थान धुळे संघाने मिळविले आहे. विजेतपद पटकावलेले रायगडचे खेळाडू राज बामुगडे, अश्मन म्हात्रे, कुणाल पाटील, ऋग्वेद मोरे, संस्कार देशमुख, कुणाल पाटील, हार्दिक म्हात्रे, आयुष दिघे, सुयश वाघमारे, विघ्नेश थिटे, विराज म्हात्रे, आयुष मनवे, पार्थ कोळी, सिद्धांत गुरव तर प्रशिक्षक म्हणून महेश म्हात्रे, भरत गुरव व व्यवस्थापक म्हणून जयदीप पाटील यांनी काम पाहिले आहे.

**या स्पर्धेत गुणवंत फलंदाज हा किताब राज रोशन (रायगड) या खेळाडूने पटकावले तर मुलींमध्ये संस्कृती (नागपूर) हिला देण्यात आला. उत्कृष्ट गोलंदाज हा किताब अनिकेत बोर्डे (अहमदनगर) व कोमल बडगुजर (धुळे) यांना देण्यात आला. तर, अष्टपैलू हा किताब विनोद शिंदे (धुळे) व धनश्री काकड (नाशिक) यांना देऊन सन्मानित करण्यात आले.**



# ताईक्कांडो स्पर्धेत रायगड द्वितीय

**। पनवेल । वार्ताहर ।**

ताईक्कांडो असोशियन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) या अधिकृत संघटनेमार्फत राज्यस्तरीय वरिष्ठ ताईक्कांडो स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेला महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यांमधून ४८० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा दि. ८ ते ३० सप्टेंबर दरम्यान लातुर औसा रोड येथील क्रीडा संकुलात घेण्यात आली होती. या स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले आहे. यात ६ सुवर्ण, ४ रौप्य आणि ७ कांस्य अशी एकूण १७ पदके मिळवुन सांघिक दुसरा क्रमांक पटकावला आहे. तसेच, या स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू पाँडिचेरी येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

**सुवर्णपदक विजेते:- प्रशांत घरत, राकेश जाधव, रुपेश माळी, प्राजक्ता अंकोलेकर, मुग्धा भोसले आणि प्रशांत घरत. रौप्यपदक विजेते:- अक्षता भगत, गायत्री भंडारे, रतिका अहुजा आणि संदीप प्रभु. कांस्यपदक विजेते:- दिनेश म्हात्रे, निर्मिती दत्ता, कार्तिका नारायण (३), रूपेश माळी आणि दिनेश म्हात्रे.**

# अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब ऑफ पनवेल आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकासमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धा दि. ५ ते ६ ऑक्टोबर या कालावधीत नवीन पनवेल सेक्टर १८ येथील सिडको समाज मंदिरात रायगड जिल्हा टेबलटेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी (दि.५) सकाळी दहा वाजता लायन्स क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष लायन एस.जी. चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी लायन्स क्लब ऑफ पनवेलचे सेक्रेटरी अशोक गिल्डा, खजिनदार मनोज म्हात्रे, प्राजेक्ट चेअरमन राजेंद्र जेसवानी, संजय पोतदार, नागेश देशमाने, नंदकिशोर धोत्रे, के.एस. पाटील, मधुकर भगत, मदन गोवारी, हेमंत ठाकुर, गौतम म्हस्के, सुयोग पेंडसे तसेच माजी लायन अध्यक्षा मीना पोतदार, ज्योती देशमाने, भावना जेसवानी, शोभा गिल्डा, लायन सभासद आणि लिओ क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष व सभासद मोठ्या संखेने उपस्थित राहणार आहेत.

तसेच, पुणे बालेवाडी येथे दि. ६ ते १० नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यांत आलेल्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेसाठी संघ निवडतांना या स्पर्धेतील विजयी खेळाडूंचा विचार केला जाणार आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना लायन्स क्लब ऑफ पनवेलतर्फे सहभाग प्रमाणपत्र देण्यांत येणार आहेत. तसेच, विजयी व उपविजयी स्पर्धकांना चषक, रोखरक्कम आणि गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यांत येणार आहेत.

# पोयनाड हायस्कूलची 'ढाल' सर्वोत्कृष्ट

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

कांदळवन संरक्षण आणि संवर्धन विषयावरील जिल्हास्तरीय माध्यमिक पर्यावरण बालनाट्य स्पर्धा रविवार दि.२९ सप्टेंबर रोजी अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी हॉल येथे संपन्न झाली. या स्पर्धेत कोएसो ना.ना पाटील हायस्कूल पोयनाडने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

मॅग्रूव्हज फाउंडेशन मुंबई, इकोफोक्स व्हेंचर्स मुंबई आणि वनविभाग अलिबाग तर्फे जिल्हास्तरीय माध्यमिक पर्यावरण बालनाट्य स्पर्धा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात कांदळवनाचे अधिकारी प्रिती सावंत, प्रांजली भगत, अशोक शिंद हे प्रमुख अतिथी तर या स्पर्धेचे प्रमुख आयोजक परेश पिंपळे उपस्थित होते.



यावेळी पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन या विषयावर झालेल्या या जिल्हास्तरीय बालनाट्य स्पर्धेत कोएसो ना.ना. पाटील हायस्कूल पोयनाडचे योगेश कदम लिखित 'ढाल' हे बालनाट्य प्रथम, राजिप प्राथमिक शाळा पेझारीचे संतोष गार्डी लिखित 'मिशन एकच संवर्धन' द्वितीय तर न्यू इंग्लिश स्कूल वलग महाडचे गंगाधर साळवी लिखित 'कांदळवनाचे महत्त्व' ने तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच, ए.एस. निकम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय माणगावचे आणि कोएसो विद्यामंदिर शहाबाजचे राजन पांचाळ लिखित 'कांदळवन' नाटकाला उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले आहे.

स्पर्धेत उत्कृष्ट दिग्दर्शनासाठी प्रथम क्रमांक ना.ना.पाटील हायस्कूलचे देवेंद्र पाटील, द्वितीय क्रमांक राजिप प्राथमिक शाळा पेझारीचे अजय ठाकूर तर तृतीय क्रमांक न्यु स्कूल वलग महाडचे गंगाधर साळवी यांनी पटकावले आहे. तसेच, मुलींमध्ये अभिनयात प्रथम स्वरा पाटील, द्वितीय श्रावणी सुतार, तृतीय रिशीता टकले तर उत्तेजनार्थ रिद्धी पिंगळे आणि मुलांमध्ये अभिनयात प्रथम आराध्य पाटील, द्वितीय समर बर्वे, तृतीय श्लोक जाधव तर उत्तेजनार्थ वरद पाटील यांना बक्षिस देण्यात आले आहे.

# वैभव सूर्यवंशीची दमदार खेळी



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत-ऑस्ट्रेलिया यांच्या १९ वर्षांखालील संघामध्ये कसोटी सामना सुरू आहे. भारताने प्रथम फलंदाजी करताना ऑसी गोलंदाजांना चांगला चोप दिला. विहान मल्होत्रा आणि वैभव सूर्यवंशी यांनी दमदार खेळ करताना भारताला १३.१ षटकांत शतकी पल्ला गाठून दिला. रोहित शर्मा व यशस्वी जैस्वाल यांच्या खेळीने प्रेरित होऊन वैभवने ऑस्ट्रेलियन गोलंदाजांवर हल्लाबोल केला होता. तसेच, १९ वर्षांखालील कसोटीत अर्धशतक झळकावणारा तो युवा फलंदाज ठरला.

यावेळी १३ वर्षांच्या वैभवने ९ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे. या आधी नजमूल शांतोने १४ वर्षांचा असताना २०१३ मध्ये श्रीलंकेविरूद्ध अर्धशतक झळकावले होते. शांतो हा सध्या बांगलादेशचा कर्णधार आहे. बिहारच्या वैभवने मागच्या वर्षी मुंबईविरुद्ध प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. त्याने ही फटकेबाजी सुरू ठेवताना ५८ चेंडूंत शतक पूर्ण केले आणि १९ वर्षांखालील कसोटीत हे भारतीयाचे वेगवान शतक ठरले आहे. तसेच, मन्जोत कार्ला (१०१) व शुभमन गिल (१०९) यांचा विक्रम त्याने मोडला आहे. या विक्रमात वैभवचा जगात दुसरा क्रमांक लागत आहे. मोईन अलीने २००५ मध्ये ५६ चेंडूंत शतक झळकावले होते.

# 'पाकिस्तानात जाण्याचे भारत सरकार ठरवेल'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आगामी १९ फेब्रुवारी ते ९ मार्च या कालावधीत आयसीसी अजिंक्यपद चषक स्पर्धेचे यजमानपद पाकिस्तानकडे आहे. यासाठी भारतीय संघ पाकिस्तानमध्ये जाणार की नाही? याबाबत अद्याप स्पष्टता नाही. तत्पूर्वी कानपूरमध्ये बांगलादेशविरुद्ध सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवसाच्या खेळाच्या पार्श्वभूमीवर राजीव शुक्ला यांनी पत्रकारांना सांगितले की, याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. आंतरराष्ट्रीय दौऱ्यांसाठी नेहमीच सरकारची परवानगी घेण्याचे आमचे धोरण आहे. आमच्या संघाने कोणत्याही देशाचा दौरा करायचा की नाही? हे सरकार ठरवते. या बाबतीतही सरकार जो काही निर्णय घेईल, आम्ही त्याचे पालन करू.

# 'अभिषेकसोबत रिंकूची सलामी'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत विरुद्ध बांग्लादेश यांच्यातील टी-२० मालिकेची जोरदार चर्चा सुरु आहे. बीसीसीआयने नुकतेच या मालिकेसाठी युवांनी भरलेला भारतीय संघ जाहीर केला आहे.



यामध्ये ओपनिंग कोण करणार हा प्रश्न आहे? यासाठी सबा करीम यांनी भारतीय संघाचा पर्याय सुचवला आहे. जो की चाहत्यांना नक्कीच आकर्षित करेल.

भारत आणि बांग्लादेश यांच्यातील टी-२० मालिकेला ६ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. भारताच्या संघात अनेक तरुण चेहरे पाहायला मिळणार आहेत. संघाची कमान सूर्यकुमार यादवच्या हाती असेल. दरम्यान, सबा करीमने बोलताना म्हणाले की, रिंकू सिंग आणि अभिषेक शर्मा यांना सलामीवीर म्हणून एकत्र पाहण्याची दाट शक्यता आहे.

रिंकूला आतापर्यंत या संघात ज्या काही संधी मिळाल्या आहेत तो सहा किंवा सातव्या क्रमांकावर आला आहे. त्याला खेळण्यासाठी कमी चेंडू मिळतात. त्यामुळे त्याला अधिक संधी मिळाल्यास तो संघात अधिक मूल्य वाढवू शकतो. या मालिकेत रिंकू वरच्या क्रमांकावर खेळेल याची शक्यता आहे.

# महाराष्ट्राच्या लेकाचा जगात डंका

**। लिमा । वृत्तसंस्था ।**

लिमा पेरू येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ कनिष्ठ जागतीक चॅम्पीयन स्पर्धेत महाराष्ट्राच्या पार्थ माने याने संयम आणि अचूकतेचा उल्लेखनीय प्रदर्शन केले आहे. १६ वर्षीय पार्थ माने याने कपिष्ठ पुरुषांच्या १० मीटर एअर रायफलमध्ये सुवर्णपदक जिंकले आहे. पार्थने २५०.७ गुणांसह हे पदक जिंकले. तसेच, पार्थ भारताच्या माजी नेमबाज सुमा शिरूर यांच्या प्रशिक्षण घेत आहे.



पार्थने ६२७.७ गुणांसह चौथ्या पात्रता फेरीत अव्वल स्थान पटकावले होते. त्यानंतर अंतिम फेरीत त्याने आपले कौशल्य दाखवून दिले. त्याने चीनच्या हुआंग लिवानलीनचा ०.७ गुणांनी पराभव करून सुवर्णपदकावर नाव कोरले. हुआंगला २५०.० गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. हुआंगने या स्पर्धेत मिश्र गटाचे एक सुवर्णपदक आधीच नावावर केले आहे. अमेरिकेच्या ब्रेडन वेयनने २२९.१ गुणांसह कांस्यपदक जिंकले. आश्चर्यकारक म्हणजे जागतिक विजेता आणि पॅरिस ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता स्वीडनचा व्हिक्टर लिंडग्रेन हा चौथ्या स्थानावर राहिला.

# क्रिकेटच्या देवाची बॅट पुन्हा तळपणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

सध्या टी-२० क्रिकेटची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. या फॉरमॅटच्या सुरुवातीपासून अनेक फ्रँचायझी लीग सुरू झाल्या आहेत. या लीग केवळ सक्रिय खेळाडूंनाच नव्हे तर निवृत्त खेळाडूंनाही त्यांची प्रतिभा दाखवण्याची संधी देत असतात. अशीच आणखी एक इंटरनॅशनल मास्टर्स लीग सुरू होणार आहे. या लीगमध्ये क्रिकेटचा देव म्हणून ओळखला जाणारा सचिन तेंडुलकरही आपले कौशल्य दाखवणार असून, सुनील गावसकर यांना या लीगचे आयुक्त करण्यात आले आहे. या लीगचे सामने मुंबई, लखनौ तसेच रायपूर येथे खेळवले जाणार आहेत. इंटरनॅशनल मास्टर्स लीग ही वार्षिक टी-२० क्रिकेट स्पर्धा असेल, ज्यामध्ये सुरुवातीला भारत, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडीज, इंग्लंड आणि श्रीलंका या सहा क्रिकेट खेळणाऱ्या देशांतील खेळाडूंचा समावेश असणार आहे. या लीगमध्ये अनेक निवृत्त दिग्गज दिसणार आहेत. यामुळे चाहत्यांना जुन्या आठवणी ताज्या करण्याची संधी मिळणार आहे.




भारतीय दिग्गज सचिन तेंडुलकरच्या पुनरागमनाने लाखो चाहत्यांमध्ये पुन्हा उत्साह निर्माण केला आहे. तो पुन्हा एकदा २२ यार्डच्या खेळपट्टीवर बॅटने धावा काढताना दिसणार आहे.

## मालिका २-० ने जिंकून बांगलादेशला व्हाईटवॉश

# भारतीय संघाची 'अजिंक्य' कसोटी

**। कानपूर । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाने कानपूरला झालेल्या बांगलादेश संघाविरुद्ध दुसऱ्या कसोटी सामन्यात ७ गडी राखत विजय मिळवला आहे. भारताने बांगलादेशविरुद्ध पहिला कसोटी सामना चेन्नईला खेळला होता. या सामन्यात भारताने २८० धावांनी विजय मिळवला होता. तसेच, दुसऱ्या सामन्यातही विजय मिळवल्याने आता भारतीय संघाने मालिका २-० ने जिंकून बांगलादेशला व्हाईटवॉश दिला आहे. भारताने कानपूर कसोटी जिंकून जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतील अव्वल स्थानावरील पकड आणखी मजबूत केली आहे.

कानपूर कसोटीचे अडीच दिवस पावसामुळे वाया गेल्यानंतरही कॅप्टन रोहित शर्माने रणनीती आखली होती. सहकाऱ्यांनीही त्याची योग्य अंमलबजावणी करताना अशक्य वाटणारा विजय मिळवला आहे. दुसऱ्या कसोटीचा पहिला दिवस ३५ षटकांचा झाला. यानंतर दुसरा व तिसरा दिवस पावसामुळे एकही चेंडू न पडता वाया गेला. असे असतानाही ही मालिका जागतीक कसोटी अजिंक्यपद २०२३-२५ स्पर्धेचा भाग असल्याने निकाल महत्त्वाचा होता. चौथ्या दिवशी भारतीय गोलंदाजांनी योग्य मारा करून बांगलादेशचा पहिला डाव २३३ धावांवर गुंडाळला. प्रत्युत्तरात भारताने रणनीती बदलली आणि पहिल्या डावात टी-२० स्टाईलने फटकेबाजी केली. झटपट ९ बाद २८५ धावा करून डाव घोषित केला आणि ५२ धावांची आघाडी घेतली. यानंतर बांगलादेशचा दुसरा डाव १४६ धावांवर गुंडाळला गेला. भारतीय संघाने १७.२ षटकांत ३ बाद ९८ धावा करून विजयाची नोंद केली आणि मालिकाही खिशात घातली. मालिकेच्या निकालाचा परिणाम जागतीक कसोटी अजिंक्यपदाच्या गुणतालीकेवर देखील झाला आहे. भारताने ही मालिका जिंकल्याने आपले अव्वल स्थान भक्कम केले आहे.




दरम्यान, कसोटीत अश्विनने ११ बळी घेतले आणि यशस्वी जैस्वालने दोन्ही डावांत (७२ व ५१) अर्धशकी खेळी केली आहे. यामुळे जैस्वालला सामनावीर तर अष्टपैलू कामगिरी करणाऱ्या अश्विनला मालिकावीर म्हणून गौरविण्यात आले आहे. यावेळी बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांच्या हस्ते कर्णधार रोहितला चषक देण्यात आले. राहितने हे चषक आकाश दीपच्या हाती सोपवले आणि स्वतः कोपऱ्यात जाऊन उभा राहिला. रोहितच्या या कृतीने सर्वांची मनं जिंकली.

### तिसऱ्यांदा अंतिम सामना खेळण्याची संधी

**भारताचे आता ११ सामन्यांपैकी ८ विजय आणि २ पराभवांसह ९८ गुण झाले आहेत. तसेच, ७४.२४ सरासरी टक्केवारी आहे. भारताने ही मालिका जिंकल्याने आता भारतासाठी पुढचा मार्ग सोपा झाला आहे. तरी अद्याप त्यांच्यासमोर न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया संघांचे आव्हान कायम आहे. ऑक्टोबरमध्ये न्यूझीलंडविरुद्ध मायदेशातच तीन सामन्यांची कसोटी मालिका तर नोव्हेंबरमध्ये भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार असून तिथे ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळली जाणार आहे. या मालिकेतही जर भारताची कामगिरी चांगली राहिली, तर भारत तिसऱ्यांदा जागतीक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामना खेळताना दिसेल.**

### घरच्या मैदानावर भारत अजिंक्य

**भारतीय संघ २०१३ पासून घरच्या मैदानावर एकही कसोटी मालिका पराभूत झालेला नाही आणि हा त्यांचा १८वा कसोटी मालिका विजय ठरला. ऑस्ट्रेलियाने यापूर्वी १९९४ ते २००० व २००४ ते २००८ या कालावधीत सलग १० कसोटी मालिका जिंकण्याचा पराक्रम केला होता.**



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)